नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १८३ * * अमरावती * सोमवार, दिनांक ५ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## गांधीनगरमध्येही दूषित पाणीपुरवठा

■ **वृत्तसंस्था, गांधीनगर, दि. ४ :**
मध्य प्रदेशातील इंदूरनंतर आता गुजरातच्या गांधीनगरमध्येही दूषित पाण्याचा प्रादुर्भाव सुरू झाला आहे. दूषित पाणी पिल्यामुळे शेकडो नागरिक टायफॉइडग्रस्त झाले असून, सध्या १०४ रुग्णांना रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू आहेत. राजधानी गांधीनगरमध्येही इंदूरसारखीच गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. वृत्तानुसार, सेक्टर २४, २६, २८ आणि आदिवाडा परिसरात टायफॉइडच्या रुग्णांची नोंद झाली आहे. दूषित पाणी पिल्यामुळे अनेक लोक आजारी पडले असून, आरोग्य विभागाच्या पथकांनी तात्काळ काम सुरू केले आहे. घरोघरी सर्वेक्षण सुरू असून पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइनची दुरुस्ती देखील सुरु आहे.

अग्राग्रलेख
खरीखरी..

# ट्रम्पची डाकूगिरी

दक्षिण अमेरिकेत व्हेनेझूएला नावाचा एक देश आहे. या देशात मोठ्या प्रमाणावर तेल उपलब्ध आहे. त्या देशात अनेक वर्षापासून निकोलस मादूरो नावाच्या व्यक्तीची सत्ता आहे, तो गेल्या वीस वर्षापासून तेथील राष्ट्रपती आहे. त्याने आपल्या देशातील तेलाचा व्यापार करणाऱ्या अमेरिकी कंपन्यांना बाहेरचा रस्ता दाखवला, त्या कंपन्यांना या देशातून तेल निर्मितीमुळे मोठाच नफा होत होता. त्यानंतर ट्रम्प नावाच्या अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी आपल्या देशातील कंपन्यांच्या म्हणजे त्यांच्या मालकांच्या फायद्यासाठी जे पाऊल उचलले आहे ते थरकाप उडवणारे आहे. एका देशाच्या राष्ट्रपतीला भर मध्यरात्री तो निद्रिस्त असलेल्या बेडरूम मधून जबरदस्त आक्रमण करून त्याचे अपहरण करणे आणि त्याला हातकडी घालून अमेरिकेपर्यंत आणणे ही तर दादागिरीचीच नव्हे तर डाकूगिरीचीही पराकाष्ठा आहे. १९६२ सालात अमेरिकेच्या जवळील क्युबा देशाचा अध्यक्ष फिडेल कॅस्ट्रो होता त्याला सोवियत संघाचा जबरदस्त पाठिंबा होता. त्या वेळचे अध्यक्ष अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी यांनी क्युबाला धमकी दिली होती की जर फिडेल कॅस्ट्रो याने अमेरिकेचा विरोध केला तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. ही गोष्ट कळताच रशियाच्या क्रुश्चेव्ह यांनी क्युबाच्या मदतीला चार अण्वस्त्रे पाठवली त्यामुळेच केनेडीला भविष्यातील धोका ओळखून गप्प बसावे लागले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर जग दोन महाशक्तींमध्ये विभागले गेले. अमेरिकेच्या निक्सनने बांगला देशच्या लढाईत आपल्या भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना धमकी दिली होती. त्यावेळी इंदिराजींनी सोवियत संघाबरोबर करार करून त्यांच्याही तोडीसतोड सुरक्षा प्रणाली आणण्याची तयारी केली होती. तेव्हाही निक्सनला माघार घ्यावी लागली याचे कारण अमेरिकेला आणि अमेरिकेच्या धमकीला पुरून उरेल अशी शक्ती सोवियत संघाजवळ होती. त्यानंतरच्या पुढील पंधरा वर्षात याच बलाढ्य सोवियत संघाचे तुकडे तुकडे झाले, सोवियत संघ उरला नाही त्यामुळे रशियाची शक्ती मर्यादित झाली. आजचा रशिया एकेकाळी त्याचा सहकारी असलेल्या युक्रेनला गेल्या चार वर्षात जिंकू शकत नाही ही सध्याची वस्तूस्थिती आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की, जगात अमेरिका सर्वात शक्तिशाली आहे आणि त्यांना जे वाट्टेल ते वाट्टेल तिथे करतील. मध्यंतरी अमेरिकेने खोटे आरोप करून सद्दाम हुसेनला मारून टाकले. सध्याच्या स्थितीमध्ये व्हेनेझुएला देशाच्या अध्यक्षाला आपण अध्यक्ष मानतच नाही. असा आरोप करून अमेरिकेने जागतिक डाकूगिरी करत एका देशाच्या राष्ट्रपतीचे अपहरण ट्रम्पने केले असे म्हणण्यापेक्षा त्याला उचलले असे म्हणणेच योग्य ठरेल. व्हेनेझुएला या देशांमध्ये संघीय प्रजासत्ताक आहे असे म्हणतात. त्या अध्यक्षाला तेथील जनतेने निवडून दिले होते अशा लोकनिर्वाचित अध्यक्षाला बंदी बनवून अमेरिकेत आणले गेले आहे. आता तर म्हणे अमेरिकेत त्याच्यावर खटला चालणार आहे. या दरोडेखोरी विरुद्ध जगात अनेक देशांनी ट्यावट्याव केले आहे. चीन, रशिया, ब्राझील, ब्रिटन, आणि इटली यासारखे इतर अनेक देश याबाबत विरोधी सूर काढत आहेत. यातील अनेक राष्ट्रे ब्रिक्स नावाच्या संघटनेची सदस्य आहेत, त्याच ब्रिक्स संघटनेत भारतही आहे. ट्रम्पने केलेल्या या हल्ल्याचे आणि अपहरणाचे अमेरिकेतील कंपन्यांनी समर्थन केलेले आहे. त्यातच ट्रम्पने आता खुलेआम घोषणाच करून टाकलेली आहे की, अमेरिकेच्या त्याच कंपन्या व्हेनेझुएला येथे पुन्हा कार्यरत होतील. त्या देशात संपूर्ण जगातील दहा टक्के तेल आहे असे म्हणतात, त्यामुळेच अमेरिकेच्या कंपन्यांना बंदी केल्याने त्या देशाच्या व्यापारावर अनेक बंधने ट्रम्पच्या राजवटीत लादली गेलेली आहेत. त्यामुळे त्या देशामध्ये असंतोष आहे, महागाई पसरली आहे. उद्या जगातील बलाढ्य देशांनी असेच केले तर काहीही घडू शकते. चीन उद्या तैवान मध्ये असेच आक्रमण करून त्यावर कब्जा करू शकतो. रशिया युक्रेनच्या अध्यक्षाला पकडून नेऊ शकतो. जगात दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या युनोला आता कवडीचीही किंमत उरलेली दिसत नाही. सध्या जगात अमेरिका बळी आहे आणि बळी तो कान पिळी, असा त्याचा ट्रम्पशाहीतील खाक्या आहे. जग काय म्हणेल याची चिंता जगाने करावी, आम्ही जे आम्हाला वाट्टेल ते करू शकतो, असे डोनाल्ड ट्रम्प याला वाटते. जोपर्यंत अमेरिकेत ट्रम्प आहे, तोपर्यंत तिथे अशाच प्रकारच्या डाकूगिरीची, मनमानीची आणि दादागिरीची हुकूमत चालणार आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# 'शिवशक्ती'चा वचननामा जाहीर

## महाराष्ट्रातला प्रत्येक महापौर मराठीच असणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**
मुंबई महापालिकेसाठी सर्वच राजकीय पक्षांची जोरदार तयारी सुरू झाली आहे. त्यात आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी युती केली आहे. आज शिवसेना भवनात संयुक्त पत्रकार परिषद घेत ठाकरे बंधू मुंबईसाठी वचननामा प्रकाशित करणार आहेत. 'मुंबईकरांसाठी शिवशक्तीचा वचननामा' असे या वचननाम्याला नाव देण्यात आले आहे.

ठाकरे बंधूंच्या आजच्या पत्रकार परिषदेपूर्वी शुक्रवारी आमदार आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत मुंबईसाठी वचननामा सादर केला होता. हा वचननामा उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यासोबत चर्चा करून जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी आदित्य ठाकरे यांनी दिली होती. त्यानुसार आज शिवसेना भवनात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत वचननामा जाहीर केला. विशेष म्हणजे राज ठाकरे हे तब्बल २० वर्षांनंतर शिवसेना भवनात आले असल्याने शिवसैनिक आणि मनसैनिकांसाठी हा क्षण विशेष ठरला आहे.




पत्रकार परिषदेच्या सुरुवातील खासदार संजय राऊत यांनी संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर दोन्ही ठाकरे बंधूंनी वचननाम्याचे प्रकाशन केले.

यावेळी बोलताना राज ठाकरे म्हणाले, २० वषानंतर मला सुटून आल्यासारखे वाटत आहे. राज ठाकरे २० वर्ष जेलमध्ये होते आज त्यांचे स्वागत करू. आज खूप वर्षांनी मी इथे आलो. मला नवीन शिवसेना भवन मी पहिल्यांदाच बघत आहे. माज्या मनात ज्या आठवणी कोरल्या गेल्या आहेत, त्या जुन्या शिवसेना भवनाच्या होत्या. त्या आठवणी रोमांचकारी आणि आनंददायी होत्या.

उद्धव ठाकरे म्हणाले, राज ठाकरे इथे आले याचा आनंदच आहे. आज आपल्या सर्वांसमोर शिवशक्तीचा वचननामा आम्ही जनतेच्या चरणी सादर करत आहोत. या शिवशक्तीमध्ये शिवसेना आहे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आहे, शरद पवारांचा राष्ट्रवादी पक्ष आहे. हा वचननामा आपल्या माध्यमातून सादर केला आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आता झुंडशाही सुरू झाली आहे. मतचोरी त्यांची उघडकीस आणल्यानंतर त्यांनी आता उमेदवार पळवणे सुरू केले आहे. बिनविरोध निवडणूक प्रक्रिया जे ते राबवत आहेत, हे लोकशाचा अपमान आहे. राहुल नार्वेकर यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केला आहे. त्यांच्यावर राज्य निवडणूक आयोगाने कारवाई करायला पाहिजे. कारण विधानसभा अध्यक्ष हा कोणत्याही पक्षाचा नसतो आणि तो कोणत्याही पक्षाच्या प्रचारासाठी किंवा समर्थनासाठी जाऊ शकत नाहीत. परंतु, त्यांनी संरक्षण काढून घेण्याचे आदेश जे काही दिले, हा त्यांना अधिकार बाहेर नसतो, विधानसभेत असू शकतो.

# मुंबई कुणाच्या बापाची नाही : फडणवीस

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**



मुंबई कुणाच्या बापाची मालमत्ता नाही आणि मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याची हिंमत कुणाच्या बापाच्या बापाच्या बापातही नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीका केली.

वरळीत महायुतीच्या प्रचाराचा शंखनाद झाला. या वेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले उपस्थित होते. शिवसेनेतील फुटीवर भाष्य करताना फडणवीस म्हणाले, जन्माने रक्ताचा वारसा मिळू शकतो, पण विचारांचा वारसा कर्माने मिळतो. तो वारसा आज एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. फडणवीसांनी मनपातील ७० हजार कोटींच्या मुदत ठेवींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

या रसिदी काय आम्ही चाटायच्या? गिरणी कामगार देशोधडीला लागला तेव्हा हे पैसे का वापरले नाहीत? आम्ही बिल्डरांच्या घशात जमीन न देता म्हाडाच्या माध्यमातून बीडीडी चाळीतील ८० हजार मराठी माणसांना ५०० फुटांची घरे मोफत दिली, असे त्यांनी सांगितले. संविधान बदलण्याची भीती घालणाऱ्या काँग्रेसलाच आता जनता सत्तेतून बदलल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

# मद्य पाजण्यास नकार दिल्याने मित्राचा केला खून

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :**
राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या शहरात नव्या वर्षात पहिल्याच आठवड्यात कायदा व सुव्यवस्थेला गुंडांनी आव्हान दिले आहे. मद्य पाजण्यास नकार दिला म्हणून सहा जणांनी मिळून मित्रांवरच लोखंडी रॉडने केलेल्या प्राणघातक हल्ल्यात एकाचा गंभीर रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला. या जीवघेण्या हल्ल्यात आणखी चौघे जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.

कळमना पोलीस हद्दीतील पर्वती नगरातल्या माझरी रेल्वे बोगद्याजवळ शनिवारी रात्री साडे आकराच्या सुमारास ही थरारक घटना घडली. रितिक सावनलाल पटले (२२) रा. पार्वती नगर, कळमना गाव असे जीवघेण्या हल्ल्यात खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर यात सलिम शेख, शिवप्रसाद नागपुरे, संगीता, तनशू शिवप्रसाद हे चौघे जखमी झाले. यापैकी सलिमची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

ईशा हातिम अन्सारी (५५), मुस्तफा उर्फ गोलू ईशा अन्सारी, लुकमान ईशा अन्सारी (२२) साहिल ईशा अन्सारी (२०) सलाउद्दीन ईशा अन्सारी (१९), शाहिद उर्फ बबूआ इशा अन्सारी अशी मित्रांवरच लोखंडी रॉडने हल्ला करत खून केलेल्या सहा जणांची नावे आहेत.




# बांगलादेशचा टी-२० वर्ल्ड कपसाठी भारत दौऱ्यावर बहिष्कार

■ **वृत्तसंस्था, ढाका, दि. ४ :**
भारत आणि बांगलादेश यांच्यातील क्रिकेट संबंधांमध्ये मोठी दरी निर्माण झाली असून, याचे रूपांतर आता कूटनैतिक संघर्षात झाले आहे. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने अधिकृतपणे मागणी केली आहे की, पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० वर्ल्ड कपमधील बांगलादेशचे सर्व साखळी सामने भारताऐवजी श्रीलंकेत आयोजित करावेत. बांगलादेशचा खेळाडू मुस्तफिजुर रहमानची आयपीएलमधून हकालपट्टी केल्याने बांगलादेशने ही आक्रमक भूमिका घेतली आहे.

बांगलादेश सरकारचे युवा आणि क्रीडा सल्लागार आसिफ नजरूल यांनी या मुद्द्यावर अत्यंत कठोर भूमिका मांडली आहे.

रविवारी बीएसएस वृत्तसंस्थेशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, आम्ही कोणत्याही परिस्थितीत बांगलादेशी क्रिकेट, आमचे खेळाडू आणि देशाचा अपमान सहन करणार नाही. गुलामगिरीचे दिवस आता संपले आहेत. नजरूल यांनी पुढे जोर देऊन सांगितले की, बांगलादेश आता स्वतःच्या अटींवर पुढे जाईल आणि कोणताही बाह्य दबाव किंवा अपमानास्पद वागणूक स्वीकारली जाणार नाही.







# उद्धव ठाकरेंनी ३ लाख कोटींचा भ्रष्टाचार केला : अमित साटम

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :**



अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरेंवर पलटवार केला आहे. सोबतच उद्धव ठाकरे यांनी तब्बल ३ लाख कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप साटम यांनी केला आहे.

अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले. ठाकरेंनी साटम यांचा उल्लेख चाटम असा केला होता. यावर बोलताना उद्धव ठाकरेंनी मला शिवी नाही दिली. त्यांनी प्रत्येक मराठी माणसाला शिवी दिली आहे. त्यांनी मराठी माणसाचा अपमान केला आहे. मी सामान्य कुटूंबातून आलेलो आहे. कोणाच्या आशीवार्दाने आलो नाही, असा टोला साटम यांनी लगावला. तसेच पुढे बोलताना ठाकरेंनी कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे, असा आरोप साटम यांनी केला. मुंबई शहरात रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता अशी स्थिती आहे. गेल्या १० वर्षांमध्ये २१ हजार कोटी रुपये खर्च करून रस्त्याची अवस्था बिकट आहे.

हे उद्धव ठाकरे यांच्यामुळेच झाले आहे. कोरोना काळात महालक्ष्मी येथील कोव्हिड सेंटर हे बिल्डरच्या भल्यासाठीच उभारण्यात आले होते. बॉडी बॅग, पीपीई कीट असे काहीही त्यांनी सोडले नाही, असा आरोप साटम यांनी केला.

# भिवंडीत प्रचारादरम्यान तुफान राडा

## भाजप-काँग्रेस कार्यकर्ते आमनेसामने, दोन गंभीर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडत असताना भिवंडीत शनिवारी सायंकाळी मोठा राडा झाला. प्रभाग क्रमांक २० मधील नारपोली भंडारी चौक परिसरात भाजप आणि काँग्रेस उमेदवारांचे कार्यकर्ते आमनेसामने आल्याने मोठी हाणामारी झाली.

दोन्ही गटांकडून लाठ्या-काठ्या, प्लास्टिक खुर्च्या आणि दगडांचा मुक्त वापर करण्यात आला. या घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला असून परिसरात मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, भिवंडीतील भंडारी चौक येथे भाजप उमेदवार यशवंत टावरे आणि काँग्रेस उमेदवार जितेंद्र पाल यांची कार्यालये एकमेकांपासून जवळच आहेत. शनिवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास काँग्रेसची रॅली भाजप कार्यालयाशेजारच्या गल्लीतून जात असताना कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यातूनच शाब्दिक बाचाबाची सुरू झाली आणि त्याचे रूपांतर काही वेळातच भीषण हाणामारीत झाले.

भाजप उमेदवार यशवंत टावरे यांनी असा आरोप केला आहे की, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जाणूनबुजून भाजप कार्यालयासमोर येऊन चिथावणीखोर घोषणाबाजी केली. रॅलीत पोलीस उपस्थित असतानाही काँग्रेस कार्यकर्त्यांनी दगडफेक केल्याचा दावा टावरे यांनी केला आहे.

दुसरीकडे, काँग्रेस उमेदवार वैशाली म्हात्रे यांची मुलगी हर्षली म्हात्रे यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. "आम्ही शांततेत प्रचार करत असताना भाजप कार्यकर्त्यांनी आम्हाला अडवले आणि महिलांवर दगडफेक केली. २०१७ मध्ये माझ्या वडिलांची हत्या झाली होती, आता माझ्या आईवर हल्ला करण्यात आला आहे," असे सांगत त्यांनी संताप व्यक्त केला.

**पोलिसांचा सौम्य लाठीमार**

घटनेची माहिती मिळताच नारपोली आणि भोईवाडा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार केला. या घटनेनंतर परिसरात कमालीचा तणाव निर्माण झाला असून रात्री उशिरापर्यंत दोन्ही बाजूंनी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप'च्या मार्गदर्शक पदाचा

# ८ लेखकांचा राजीनामा

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ४ :**

रणापाठोपाठ आता साहित्य क्षेत्रातही 'गौतम अदानी' यांच्या नावावरून वादाचे वादळ उठले आहे. बारामती येथील 'शरद पवार सेंटर फॉर एक्सलन्स इन एआय' या वास्तूच्या उद्घाटनासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उद्योगपती गौतम अदानी यांना निमंत्रित केल्याच्या निषेधार्थ ८ नामांकित लेखकांनी 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप'चे मार्गदर्शक पद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील लेखकांचे एक पत्र सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

गेल्या ४ वर्षांपासून या फेलोशिपसाठी मार्गदर्शक म्हणून काम पाहणाऱ्या लेखकांनी सामूहिकरीत्या हा निर्णय घेतला आहे. यामध्ये लेखक नितीन रिंढे, राजीव नाईक, गणेश विसपुते, किरण येले, रणधीर शिंदे, चंद्रशेखर फणसळकर, प्रमोद मुनघाटे, शरद नावरे यांसारख्या मान्यवरांचा समावेश आहे. ही मंडळी गेल्या 4 वर्षापासून सदर फेलोशिपसाठी मार्गदर्शक म्हणून सहभागी होते.

साहित्यिकांनी आपल्या पत्रात पद सोडण्यामागची भूमिका स्पष्ट केली आहे. "धार्मिक आणि आर्थिक पक्षपात तसेच सध्याच्या राजकीय सत्तेला आणि त्यांच्या विचारसरणीला आमचा ठाम विरोध आहे. त्याच पक्षाशी गौतम अदानींचे घनिष्ठ संबंध आहेत. अशा व्यक्तीला शरद पवार यांनी सेंटरच्या उद्घाटनाला बोलावणे ही बाब आम्हाला खटकली आहे. त्यामुळे आम्ही या फेलोशिपच्या मार्गदर्शक पदाचा त्याग करत आहोत," असे या लेखकांनी पत्रात नमूद केले आहे.



बारामतीतील गौतम अदानींना निमंत्रणाचा निषेध

या पत्राबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी विचारले असता, "असे कोणतेही पत्र अद्याप माझ्यापर्यंत पोहोचलेले नाही," अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. दरम्यान, लेखक प्रमोद मुनघाटे म्हणाले की, "आम्ही सर्व लेखकांनी मिळून हा निर्णय घेतला आहे.

## पोलिसात तक्रारीच्या धमकीने तरुणाची रेल्वेखाली आत्महत्या

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ४ :**

सातारा जिल्ह्यातील लोणंद परिसरात पोलिसात तक्रार देण्याच्या धमकीमुळे एका ३० वर्षीय तरुणाने रेल्वेखाली आत्महत्या केली. या प्रकरणी दोन महिलांसह सात जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा येवलेवाडी पोलिसांनी दाखल केला आहे.

आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव रामदास भरत पवार (वय ३०) असे आहे. शीतल काळे, अरविंद काळे, सतीश सरोदे, नितीन सरोदे, श्रृती कन्हेरे, ऋषी कन्हेरे आणि मोहन सोनार (सर्व रा. कोंढवा) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. पवार यांची बहीण रुपाली संतोष पुजारी (वय ३३, रा. बाळासाहेबनगर, लोणंद, जि. सातारा) यांनी येवलेवाडी पोलित ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामदास पवार हे कोंढव्यातील येवलेवाडी भागात असलेल्या शीतल ग्लॅमअप युनिसेक्स सलूनमध्ये कारागीर म्हणून काम करत होते. सलूनची मालकीण शीतल काळे हिच्याशी त्यांचा वाद झाला होता. आरोपींनी पवार यांना पोलिसांकडे तक्रार करण्याची धमकी दिली होती आणि तक्रार न करण्यासाठी त्यांच्याकडे पाच लाख रुपयांची मागणी केली होती.

आरोपींकडून होणाऱ्या त्रासामुळे पवार यांनी आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी बहिणीला आरोपी त्रास देत असल्याची माहिती दिली होती. पवार यांच्या बहिणीने याबाबत नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलित निरीक्षक एस. थोरात या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## उसाच्या बैलगाडीला धडकल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, पाचोड, दि. ४ :**



पाचोडहून खासगी काम आटोपून गावी परतणाऱ्या दुचाकीस्वाराचा बैलगाडीला समोरासमोर धडकून मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी रात्री साडेअकराच्या सुमारास केकत जळगावजवळ कोळीबोडखा रस्त्यावर घडली. या अपघातात ज्ञानेश्वर करूबा वाघमारे (२१, रा. केकत जळगाव) याचा जागीच मृत्यू झाला. आदेश आबासाहेब बढे (२१, रा. केकत जळगाव) हा गंभीर जखमी झाला.

दोघे मित्र खासगी कामासाठी पाचोड येथे आले होते. रात्री उशिरा दुचाकीने गावी परतत असताना कोळीबोडखा रस्त्यावर समोरून उसाची बैलगाडी येत होती. बैलगाडी रेणुकामाता-शरद सहकारी साखर कारखान्यातून ऊस खाली करून परत येत होती. अंधारामुळे बैलगाडी दिसली नाही. दुचाकी बैलगाडीला समोरासमोर धडकली. धडकेत ज्ञानेश्वरच्या छातीला आणि डोक्याला गंभीर मार लागला. आदेशच्या कमरेला, छातीला आणि डोक्याला दुखापत झाली. तो जागीच ठार झाला.

# निवडणूक आयोग ताटाखालचे मांजर

## प्रतिमा धुळीस मिळवली : संजय राऊतांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकीत ६४ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्द्यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य निवडणूक आयोगावर अत्यंत आक्षेपार्ह शब्दांत टीका केली आहे. "निवडणूक आयोग ताटाखालचे आहे आणि त्यांनी आपली प्रतिमा धुळीस मिळवली आहे," अशा शब्दांत संताप व्यक्त करत राऊतांनी आयोगाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. संजय राऊत यांच्या या विधानामुळे वाद होण्याची शक्यता आहे. ईव्हीएमवर 'नोटा'चा पर्याय असताना कायदेशीररीत्या कोणतीही निवडणूक बिनविरोध निवड कशी? असा सवालही संजय राऊतांनी यावेळी केला.



संजय राऊत यांनी बिनविरोध निवडणुकीच्या कायदेशीर वैधतेवर हल्ला चढवला. "निवडणूक आयोगाने कसला अहवाल मागवला आहे? ईव्हीएमवर 'नोटा'चे बटण असते, ते दाबण्याचा अधिकार प्रत्येक मतदाराला आहे. नोटा हा देखील एक उमेदवार असून कायद्याने त्याला अधिकार दिले आहेत. अशा परिस्थितीत निवडणूक बिनविरोध करणे हा मतदारांच्या अधिकारावर गदा आणणारा प्रकार आहे," असे राऊत म्हणाले. तसेच राहुल नार्वेकर यांच्यावर निवडणूक आयोगाने कारवाई न केल्यासंदर्भात विचारले असता संजय राऊत यांनी खालच्या शब्दांत निवडणूक आयोगावर टीका केली. हिंमत पाहिजे. तुम्ही संवैधानिक पदावर बसलेले असतात. कार्यालयात टी एन शेषन यांचा फोटो लावा आणि त्यांच्याप्रकारे काम करण्याचा प्रयत्न करता. नाहीतर लोक ताटाखालचं मांजरच म्हणणार. निवडणूक आयोगाने त्यांची प्रतिष्ठा महाराष्ट्र आणि देशात धुळीस मिळवली आहे.

# एका नगरसेवकाचे १५० कसे करायचे शिंदेंना चांगलेच माहीत : उदय सामंत

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ४ :**

आमचा आग्रह होता की, भाजप आणि शिवसेना नैसर्गिक युती असून ती झाली पाहिजे. आधी तयारी केली असती तर आम्हीदेखील १६५ जागांवर उमेदवार उभे करू शकलो असतो. काही ठिकाणी आता उमेदवार नसले तरी आगामी निवडणुकीत १२० जागांवर विजय मिळवण्याचे लक्ष्य ठेवले पाहिजे. शिवसेनेची खरी ताकद उमेदवारांनी दाखवून दिली पाहिजे. आमच्याकडे एक नगरसेवक असला तरी त्याचे १५० नगरसेवक कसे करावयाचे हे एकनाथ शिंदे यांना चांगल्या प्रकारे माहिती आहे. पक्षाची जबाबदारी आपली समजून आगामी काळात काम करावे. मनपा इतर सर्व पक्षाच्या ताब्यात होती, परंतु आता मनपा सेनेच्या ताब्यात आली पाहिजे, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

सामंत म्हणाले, पुणे मनपा निवडणूक राजकारणाच्या इतिहासात प्रथमच शिवसेना १२० जागांवर लढत आहे. उमेदवार यांचा आत्मविश्वास पाहिल्यावर १६ जानेवारी रोजी निकालादिवशी महापौर बनवताना शिवसेनेला विचारात घ्यावे लागेल, असे दिसते. आज पुण्यात सर्वत्र शिवसेनेचे भगवे वातावरण दिसत आहे. शिवसेनेने सत्तेच्या माध्यमातून केलेला विकास जनतेपर्यंत आम्ही घेऊन जाणार आहे. शिवसेना पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. या वेळी शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे, माजी मंत्री विजय शिवतारे उपस्थित होते.



सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना स्मरून पुण्याच्या विकासाची शपथ आज भाजपचे उमेदवार घेत आहेत. निवडणुकीला सामोरे जाताना जाहीरनामा जनतेसमोर ठेवून भाजप निवडणूक लढवत आहोत. भाजपने आतापर्यंत १४ जाहीरनामे केलेले असून भाजप एकमेव असा पक्ष आहे जो जाहीरनाम्यातील प्रत्येक गोष्ट पूर्णत्वास नेतो, असे मत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केले.

समताभूमी येथे सावित्रीबाई फुले आणि जोतिबा फुले यांना वंदन करून पुणे शहर भारतीय जनता पक्षाच्या महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत शनिवारी करण्यात आला. या वेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते.

# पुण्यात अजित पवारांच्या उमेदवारावर गुन्हा दाखल

**सादिक कपूर आत्महत्या प्रकरणात कारवाई**

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ४ :**

पुणे महापालिका निवडणुकीचे वातावरण तापलेले असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार फारुख इनामदार अडचणीत आले आहेत. प्रभाग ४१ मधील रहिवासी सादिक कपूर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी फारुक इनामदार यांच्यासह चार जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. खंडणी आणि जागेच्या व्यवहारातील वादातून सादिक कपूर यांनी आपले जीवन संपवल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

सादिक कपूर यांनी आत्महत्या करण्यापूर्वी सविस्तर सुसाईड नोट लिहिली होती, ज्यामध्ये फारुख इनामदार यांच्या नावाचा स्पष्ट उल्लेख आहे.

विशेष म्हणजे, मृत सादिक यांच्या हातावरही फारुख इनामदार यांचे नाव लिहिलेले आढळले आहे. सादिक यांच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरून लष्कर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या घटनेमुळे पुण्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, ऐन निवडणुकीच्या तोंडावर आपल्या उमेदवारावर गुन्हा दाखल झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेससमोर पेच निर्माण झाला आहे.

## पश्चिम बंगालमध्ये बिनविरोधाला आक्षेप

# महाराष्ट्रात का नाही?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**

पश्चिम बंगालमध्ये बिनविरोध निवडीविरोधात आक्षेप घेतला, मग आता महाराष्ट्रात का नाही? असा सवाल राज ठाकरे यांनी भाजपला केला आहे. सत्तेचा अमरपट्टा घेऊन कोणीच आलेले नाही. उद्या सत्ता परिवर्तन होईल आणि दुसरे येऊन याहून वाईट होईल, त्यावेळी आपण काय करणार याचा विचार सत्ताधाऱ्यांनी करावा, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी भाजपवर प्रहार केला.



मुंबई महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी युती केली आहे. आज शिवसेना ठाकरे गट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांचा संयुक्त वचननामा आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर आधारित प्रसिद्ध करण्यात आला. 'मुंबईकरांसाठी शिवशक्तीचा वचननामा असे नाव या वचननाम्याला देण्यात आले आहे.

राज ठाकरे म्हणाले, "पश्चिम बंगालमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बिनविरोध झाल्या होत्या, तेव्हा भारतीय जनता पक्ष सुप्रीम कोर्टात गेला होता. आता त्याच पक्षाचे आत्ताच्या महाराष्ट्रातील गोष्टींबाबत काय म्हणणं आहे? हे त्यांनी सांगावे, असा सवाल त्यांनी भाजपला विचारला.

## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०२६ सातारा

# विश्वास पाटील यांचे अध्यक्षीय भाषण



■ **महासागर प्रतिनिधी, सातारा, दि. ४ :**

बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते, असे विधान ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, पानिपतकार विश्वास पाटील यांनी केले. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात त्यांनी केलेल्या या वक्तव्यावरून सामाजिक, राजकीय तसेच साहित्यिक वर्तुळात नवा वाद सुरू होण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, महाराष्ट्रात फक्त मराठी भाषेचीच सक्ती राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

पाटील म्हणाले की, साहित्य संमेलन म्हणजे फक्त एक कार्यक्रम नसतो, तर तो देशाला आचार, विचार व दिशा देण्याचा कार्यक्रम असतो. सातारच्या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी आपण एका पाटलाला बोलावले आहे. पाटील हे आडनाव घेतले की कुस्तीचा, तमाशाचा व उसाचा फड डोळ्यासमोर उभा राहतो. पण तुमच्यासमोर बोलणारा हा पाटील फक्त शब्दांच्या फडामध्ये रमणारा आहे. ९९ व्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अशी मागणी जोशी व कुलकर्णीनी केली. तुम्हाला माहिती आहे की, बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते. ही आपली जुनी वहिवाट आहे, असे ते म्हणाले.

पाटील असेही म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी संमेलनाचे अध्यक्ष असताना लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या असे आवाहन केले होते. त्यापुढे जाऊन त्यांनी मातृभाषेतच शिक्षण दिले पाहिजे, असे सांगत मायमराठीचा पुरस्कार केला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे अशीही मागणी पाटील यांनी केली.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीच सक्तीची आहे. मराठीशिवाय अन्य कुठल्याही भाषेची सक्ती नाही. त्रिभाषा सूत्रानुसार आणखी कोणती भाषा समाविष्ट करावी यावर विचार सुरू आहे. कोणत्या वर्गापासून भाषा शिकवायची यासाठी डॉ. नरेंद्र जाधवांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे. मावळत्या संमेलनाध्यक्षा तारा भवाळकर यांनी संमेलन अध्यक्षपदाची सूत्रे नवे अध्यक्ष विश्वास पाटलांकडे सुपूर्द केली. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस, शिवेंद्रसिंहराजे भोसले, प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी आदी.

माय मराठीच्या वाङ्मयप्रेमी रसिक बंधू भगिनींना माझा मानाचा मुजरा. इथे उपस्थित असलेल्या गतवर्षीच्या दिल्लीच्या संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर. मी कॉलेजात शिकत असताना माझ्या पहिल्या वक्तृत्व स्पर्धेच्या परीक्षक आदरणीय ताराबाईच होत्या. त्यांच्या हातूनच मला वक्तृत्वाचा पहिला पुरस्कार मिळाला होता. म्हणजे तेव्हाच खऱ्या अर्थी ताराबाईंशी माझ्या तारा जुळल्या होत्या. थोर भारतीय लेखिका मृदुला गर्ग, नवमहाराष्ट्राच्या प्रगतीची सतत स्वप्ने पाहणारे आणि ती स्वप्ने वास्तवात आणण्यासाठी अहोरात्र झटणारे या प्रगतिशील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस ज्यांनी माझ्यासारख्या साहित्यिकावर शिर्डी येथील इंटरनॅशनल एअरपोर्ट बांधण्याची जबाबदारी सोपवली आणि मला ते स्वप्न पूर्ण करण्याचे भाग्य लाभले. आपल्या दिमाखाकडे आणि प्रकृतीकडे पाहिल्यावर इतिहासातला राजा वास्तवात कसा असेल याचे दर्शन घडवणारे आमचे कुरेबाज करारी उदयनराजे भोसले.

1986 साली जेव्हा मी मुंबईहून पानिपताकडे विमानाने निघालो होतो. तेव्हा अभयसिंहराजे माझ्या शेजारच्या खुर्चीवर बसलेले होते. पानिपत या विषयावर मी त्यांच्याशी चर्चा करत असताना शेवटी त्यांनी मला एकच सल्ला दिला होता, विश्वासराव असे काहीतरी लिहा की, पानिपत या शब्दाला एक दिवस पुण्यपथाचा दर्जा प्राप्त होईल. त्याच अभयसिंह राजेंच्या सुपुत्रांच्या म्हणजेच शिवेंद्रराजेंच्या हातून इथे माझा सन्मान घडावा, हा मी दुग्धशर्करा योग मानतो. मिलिंद जोशी आणि विनोद कुलकर्णीची पहिल्यापासून अशी जाहीर मागणी होती, की सातारच्या या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अन् आपल्याला माहिती आहेच, सतरा भानगडीतून गावगाडा पुढे हाकायचा म्हणजे पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते. या निमित्ताने मला इथे आमच्या पठ्ठे बापूरावांची एक लावणी आठवते,

ही नटरंगी नार,
पाडी पट्टी चोपोनिया पार
हिने पाटलाला घातला डोळा,
कुलकर्ण्याला केला खुळा
मास्तराने सोडली शाळा हिच्यासाठी!

रसिक मित्रांनो, साताऱ्याच्या या भूमीमध्ये पहिले पाऊल ठेवताना मला आमचे गुरू बॅरिस्टर पी.जी. पाटील यांची आणि माझे वाङ्मयीन गुरू श्रेष्ठ समीक्षक श्री. शंकर सारडा यांची प्रकर्षाने आठवण येते. प्राचार्य हातकणंगलेकर आणि कुलगुरू रा. कृ. कणबरकर यांचीही आठवण येते. त्याचवेळी माझ्या बालपणीचे इथल्या रम्य पाचगणीच्या महात्मा फुले हायस्कूलमधले माझे मंतरलेले दिवस मला आठवतात.

ब्रिटिश साम्राज्याला हादरा देणारे प्रतिसरकार निर्माण करणारे आमचे क्रांतिसिह नाना पाटील, जी. डी. लाड, नागनाथ नाईकवडी ते किसन वीर, धनिणीच्या बागेत रयत शिक्षण संस्था स्थापन करून शैक्षणिक क्रांती घडवणारे आमचे कर्मवीर भाऊराव पाटील. तसेच इतिहासाच्या नभांगणात तेजस्वी तारकांसारख्या उजळलेल्या महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई, महाराणी दुर्गाबाई, दिल्लीच्या दरबारात महाराणीचा अचाट अभिनय करून दिल्लीकर बादशहाला स्वतःला माँसाहेब म्हणून हाक मारायला भाग पाडणाऱ्या मैनावती दासींसह क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापर्यंत या भूमीतल्या सर्व थोर माताभगिनींना मी मानाचा मुजरा करतो.

ही भूमी मराठी नवकाव्याचे आद्य प्रणेते बाळ सीताराम मर्ढेकर यांची आणि तत्त्वज्ञानाची पेठ निर्माण करणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात उतरणारे ॲड. व्ही. एन. पाटील आणि शेखकाका इथलेच. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पंडित नेहरू आणि आचार्य कृपलानी यांच्या तेव्हाच्या उत्तर प्रांताचे म्हणजेच आजच्या उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रीपद सलग सात वर्षं भूषवणारेसुद्धा सातारचे सुपुत्र होते, ज्यांचं नाव होतं पंडित गोविंद वल्लभ पंत. कराड जवळच्या ओंड गावचे ते रहिवासी. शिवाय देश पातळीवर लोकांचा राजा म्हणून गाजलेले औंधचे बाळासाहेब पंतप्रतिनिधी, मालोजी राजे निंबाळकर, हरियाणाचे माजी राज्यपाल गणपतराव तपासे आणि त्रिपुरामध्ये मराठी माणसाचा झेंडा आणि तुरा नाचवणारे आमचे श्रीनिवास पाटील.

मित्रांनो, साहित्य संमेलन म्हणजे केवळ हौशागौशांची जत्रा नसते, कोणा वधू-वरांच्या लग्नाचे ते वऱ्हाडही नव्हे; तर महाराष्ट्राच्या साहित्य, संस्कृती आणि अस्तित्वाला आकार व दिशा देणारी सर्वमान्य अशी प्रागतिक संघटना म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन.

1878 मध्ये जे आमचे पहिले मराठी साहित्य संमेलन झाले, ज्याचा उल्लेख; आमच्या महात्मा फुल्यांनी घालमोड्यादादांचे संमेलन असा उल्लेख; नेहमी टाळीच्या एका वाक्यासाठी केला जातो. त्याच्या पल्याड खोलवर जाऊन तत्कालीन परिस्थितीचा अधिक गांभीयार्ने विचार करायला हवा. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना 1885 ला झाली. त्याच्याही आधी सात वर्षे आमचं मराठी साहित्य संमेलन जन्माला आलं आहे. म्हणजे या देशाच्या भूत-भविष्याच्या विचाराला आरंभ होण्याआधी मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या गाभ्याला साहित्य संमेलनाने हात घातला आहे.

मुळात न्यायमूर्ती रानडे यांनी साहित्य संमेलनाचा घाट घातला, त्या वेळी त्यांचं वय 38 वर्षांचं होतं. नंतर बावीस वर्षांनी याच महादेव गोविंदांनी ह्यमराठा सत्तेचा उदयास्त नावाचा मौलिक ग्रंथ लिहून प्रबोधनाला खऱ्या अर्थी इथे चालना दिली. देशाच्या आझादीचे आंदोलन असो की, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ किंवा नामांतराचा लढा अगर आणीबाणीसारखा प्रसंग. प्रत्येक ऐतिहासिक आणि निर्णायकी वळणावार मराठी साहित्य संमेलन चार पावले आघाडीवरच राहिले आहे.

15 ऑक्टोबर 1938 या दिवशी मुंबईत भरलेल्या 23 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर होते. जेव्हा साहित्यिकांना लेखण्या मोडा आणि तलवारी हाती घ्या. असा संदेश त्यांनी दिला होता, तेव्हा सावरकरांच्या अध्यक्षतेखाली 1938 मध्ये म्हणजेच 87 वर्षांपूर्वी भरलेल्या मराठी साहित्य संमेलनात दुसऱ्या क्रमांकाचा असा ठराव पास झाला होता की, हिंदुस्थानातील सर्व प्रमुख देशी भाषांची वाढ होऊन, प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच महाविद्यालयीन शिक्षणही त्या त्या प्रांतातील देशी भाषेतून दिले जावे.

जेव्हा जेव्हा भाषेवर, राष्ट्रावर आणि संस्कृतीवर संकट येते. तेव्हा-तेव्हा गेल्या दोनशे वर्षांत सामाजिक नेतृत्वाची आणि प्रसंगी राजकीय पुढाकाराची भूमिकासुद्धा साहित्यिकांनी उचललेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावेळी मोरारजी देसाईंनी आचार्य अत्रे यांना सत्तर दिवस तुरुंगात टाकले. तसेच एका वगनाट्य लेखनाच्या कारणावरून त्याच मोरारजींनी आमच्या शाहीर अण्णा भाऊ साठेंना हद्दपार केले होते. त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. कवीच्या हृदयातून आलेले सच्चे शब्द प्रसंगी सत्तेच्या सिंहासनासमोर झुकत नाहीत, हे या भूमीतल्या साहित्यिकांनी वेळोवेळी दाखवून दिले आहे.

आमच्या मुंबईचेच नागरिक असलेले प्रसिद्ध कवी मजरुह सुलतानपुरी यांनी एकदा पंतप्रधान पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली होती. त्याबद्दल मजरुहला दोन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली. मोरारजी म्हणाले, माफी मागा, सुटका होईल. कविराज मजरुह बोलले, कवीचे प्रांजळ शब्द म्हणजे भात्यातून सुटलेले बाण असतात. दोना ऐवजी चार वर्षांची शिक्षा दिलीत तरी माघार घेणार नाही.

या सातारा साहित्य संमेलनाच्या तारखा घोषित झाल्या आणि नेमकी राजकीय दृष्ट्या नाजूक वेळ उगवली. आता महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता घोषित झाली आहे. तुमची आचारसंहिता असेल तर आमची विचारसंहिता असते! तुमच्या आचारसंहितेची मुदत फक्त चारदोन आठवड्यांपुरती असते, तर साहित्य संमेलनाच्या मंथनातून निघालेल्या विचार शलाकांचा अंमल चार चार दशकेसुद्धा टिकून राहतो, हा या भूमीचा इतिहास आहे.

मित्रहो, अध्यक्ष या नात्याने मी मांडलेले विचार हे स्वतंत्र असतील. ते कोणा एका राजकीय संप्रदायाच्या बाजूचे आहेत की विरोधातले, असे ठरवण्याचा बादरायण खटाटोप कृपया कोणी करू नये. मराठी साहित्य, मराठी भाषा, तिचे अस्तित्व, मुंबईसारख्या आमच्या नगरीचे भवितव्य याबाबत काही रोखठोक मुद्दे असतील, जे कोणाला आवडतील किंवा नाहीही; पण ते मांडणे मला क्रमप्राप्त आहे. ते तुम्ही माझ्यावर सोपवलेल्या जबाबदारीचे उत्तरदायित्वच असेल.

आज या संमेलनाचा अध्यक्ष या नात्याने ही संधी देशाच्या आझादीसाठी आणि संयुक्त महाराष्ट्रासाठी झुंज दिलेल्या एका कार्यकर्त्याच्या मुलाला मिळाली आहेच; पण त्याहीपेक्षा एका अशिक्षित शेतकरी मातेच्या लेकराकडे हे पद चालून आले आहे, या गोष्टीचा मला अतिशय आनंद वाटतो.

# ‘लव्ह जिहाद’ असेल तर संसदेत आकडे सादर करा!

## एआयएमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी

महासागर | प्रतिनिधी

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.4 )** – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केलेल्या ‘लव्ह जिहाद’ संबंधी वक्तव्यावर एआयएमआयएमचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी जोरदार टीका केली आहे. जर लव्ह जिहाद प्रत्यक्षात होत असेल, तर त्याचे ठोस आकडे संसदेत का सादर केले जात नाहीत? गेल्या 11 वर्षांचा संपूर्ण रेकॉर्ड देशासमोर ठेवा, असे आव्हान ओवैसी यांनी दिले.



अमरावती येथे महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमासाठी आले असताना, त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना हा सवाल उपस्थित केला. ओवैसी म्हणाले, जर एखादी व्यक्ती प्रौढ असेल, 18 किंवा 21 वर्षांची असेल आणि ती स्वत:चे निर्णय घेत असेल, तर तो तिचा वैयक्तिक अधिकार आहे. कायद्यानुसार त्यांना तसे करण्याची मुभा आहे. हे कुणाच्या आवडीनिवडीचे प्रकरण नाही. ओवैसी यांनी पुढे स्पष्ट शब्दांत सांगितले की, भाजप आणि आरएसएसने आधी ‘लव्ह जिहाद’ या संकल्पनेची स्पष्ट व्याख्या करावी. केवळ आरोप करून समाजात भीती आणि संभ्रम पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. रोजगार, चीनचा धोका, लडाखसारखे गंभीर राष्ट्रीय प्रश्न बाजूला ठेवून अशा मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जात आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. केंद्र व राज्य सरकारवर टीका करताना ओवैसी म्हणाले की, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या विषयांपेक्षा जनतेच्या खऱ्या समस्या बेरोजगारी, महागाई, शिक्षण व आरोग्य यावर सरकारने लक्ष द्यावे. तथ्यांशिवाय केलेले आरोप देशाच्या राजकारणाला अधिक गुंतागुंतीचे बनवतात, असेही त्यांनी नमूद केले. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना ओवैसी यांनी स्पष्ट केले की, संविधान आणि कायद्याच्या चौकटीत राहून प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक स्वातंत्र्य आहे आणि त्यावर कुठलाही आक्षेप घेणे लोकशाहीला शोभणारे नाही.

# अमरावती महापालिकेत पुन्हा भाजप च सत्तेत येणार!



## अंबानगरीला महाराष्ट्रातील विकसित शहरांच्या रांगेत आणण्याचा संकल्प









### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पोलादी आत्मविश्वास

### रोड शोमधून विजयाचा हुंकार

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.4 )– अमरावती महानगरपालिकेत यापूर्वी भारतीय जनता पक्षाची सत्ता होती, त्यावेळी शहरात मोठ्या प्रमाणावर विकासात्मक कामे झाली. आता येत्या निवडणूकीतही महापालिकेत भाजपचीच सत्ता येईल, असा पोलादी आत्मविश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी( दि.4 )व्यक्त केला. ते महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर आयोजित भव्य रोड शो दरम्यान आपल्या भाषणातून बोलत होते. दुपारी 2 वाजता येथील पंचवटी चौकातून सुरू झालेला हा रोड शो राजकमल चौक, गांधी चौक मार्गे साईनगर येथे पोहोचला जेथे या रोड शो चा समारोप करण्यात आला. समारोपानंतर मुख्यमंत्र्यांनी भाषणातून आपले म्हणने जनतेपुढे मांडले.**

### पीएम टेक्सटाईल पार्क वरदान ठरणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार होणाऱ्या पीएम टेक्सटाईल पार्क व अमरावती टेक्सटाईल हबमुळे शहरात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. वडाळी व छत्री तलावांचा पर्यटन विकास, अंबानाला पुनरुज्जीवनासाठी 100 कोटी रुपये, अंबादेवी परिसर विकासासाठी 200 कोटींचा प्रकल्प, 256 कोटींचा भुयारी गटार प्रकल्प, ई–बस सेवा, स्मार्ट व पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था, सौंदर्यीकरण व पायाभूत सुविधा विकासामुळे अमरावतीचा चेहरामोहरा पूर्णत: बदलणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले अमरावतीचा विकास अधिक वेगाने करण्याचा निर्धार आमचा आहे. रोजगाराभिमुख योजना राबवून शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जाईल, महाराष्ट्रातील आधुनिक, स्मार्ट आणि रोजगारक्षम शहरांच्या रांगेत अंबानगरीला आणायचे आहे.आम्ही अमरावतीला आधुनिक शहर करून दाखवू, असे आश्वासनही यावेळी फडणवीस यांनी अमरावतीच्या जनतेला दिले.

या रोड शोमध्ये भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. चौकाचौकात पुष्पवृष्टी, फुलांच्या माळांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे जंगी स्वागत करण्यात आले. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी स्वत: रस्त्यावर उतरून बंदोबस्ताचे प्रभावी नेतृत्व केले.

### नाराजांना जागा

तिकीट वाटपात झालेल्या गोंधळामूळे काही नाराज पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर करुन त्यांना रोड शो दरम्यान थेट मुख्यमंत्र्यांच्या बाजूला उभे करण्यात आले होते. शहरातील पंचवटी चौक येथून दुपारी दोन वाजता खुल्या जीपमधून मुख्यमंत्र्यांनी अमरावतीकरांना अभिवादन करत प्रचाराची सुरुवात केली. पंचवटी चौकातून सुरू झालेला रोड शो गाडगे नगर, राठी नगर, शेगाव नाका, विलास नगर, चौधरी चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गांधी चौक, भूतेश्वर चौक, रवीनगर चौक मार्गे साईनगरपर्यंत गेला. प्रत्येक चौकात नागरिकांची मोठी गर्दी होती. फटाके, पुष्पवृष्टी आणि घोषणांनी परिसर दणाणून गेला. मुख्यमंत्र्यांसोबत खुल्या वाहनात माजी खासदार नवनीत राणा, भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, माजी आमदार प्रवीण पोटे, ?ड. प्रशांत देशपांडे उपस्थित होते. सकाळपासूनच पंचवटी चौकात भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांची गर्दी जमली होती. महापालिकेच्या 69 जागांपैकी भाजपाचे 68 उमेदवार रिंगणात असून, बहुमताच्या उद्देशाने हा रोड शो आयोजित करण्यात आला. शहरभर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान, निरीक्षक संजय कुटे यांची वाहनात चढण्यासाठी झालेली धावपळ चर्चेचा विषय ठरली.

# आरोपीकडून धारदार चाकू, गोवंश जप्त

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.4 )**– शहरातील नागपुरीगेट पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण (डीबी) पथकाने 3 जानेवारी रोजी दोन कारवाया करून, धारदार शस्त्र आणि गोवंश जप्त केले. या कारवाईत आरोपींविरुद्ध कडक गुन्हे नोंदवण्यात आले, ज्यामुळे शहरातील कायदा–सुव्यवस्था आणि जनतेची सुरक्षा सुनिश्चित करण्याचा प्रयत्न दिसून येतो.

पोलीस डीबी पथकाने अयान खान रशीद खान (वय 19, रा. अन्सारनगर, अमरावती) याच्या ताब्यातून धारदार लोखंडी फोल्डिंग चाकू जप्त केला. दुसऱ्या कारवाईत मोहम्मद अकरम मोहम्मद रउफ (वय 30, रा. बिस्मिलानगर, लालखडी रोड) याच्या ताब्यातून जनावरे जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक पोलीस आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार आणि डीबी पथकाचे राजेंद्र पिंपळे, मलिक अहमद, इरफान रायलीवाले, प्रविण ढेंगेकार, दिनेश नांदे, इमरान खान यांनी केली. या कारवाईत पोलिसांनी कायद्याची ताकद दाखवून, शहरातील सुरक्षा आणि शस्त्र तसेच जनावरांचे संरक्षण सुनिश्चित केले आहे.

महापालिका निवडणूक

# बॅलेट युनिटवरील उमेदवारांची क्रमवारी मराठी बाराखडीनुसार

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 4 )**– महानगर पालिका निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिका (बॅलेट युनिट) वरील उमेदवारांच्या नावांची अंतिम क्रमवारी मराठी बाराखडीनुसार निश्चित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांच्या उमेदवारांना वरचे स्थान देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शनिवारी उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप पूर्ण झाल्यानंतर आता बॅलेट युनिटवरील अंतिम क्रम ठरविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

निवडणूक नियमांनुसार उमेदवारांची नावे प्रथम मराठी बाराखडीनुसार आणि त्यातही आडनावाच्या क्रमाने मांडण्यात येतील. या क्रमवारीत प्रथम राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार, त्यानंतर प्रादेशिक पक्षांचे, इतर राज्यांतील नोंदणीकृत पक्षांचे उमेदवार, नोंदणीकृत पण मान्यताप्राप्त नसलेले पक्ष आणि अखेरीस अपक्ष उमेदवारांचा समावेश राहणार आहे. त्यामुळे बॅलेट युनिटवर अपक्ष उमेदवारांची नावे सर्वात शेवटी असतील.

दरम्यान, शहरातील एकूण 22 प्रभागांसाठी 7 झोन तयार करण्यात आले असून, 805 मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया



सुलभ, सुरक्षित व सर्वसमावेशक व्हावी यासाठी ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच महिला मतदारांसाठी विशेष सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा भर आहे.

महिला मतदारांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रत्येक प्रभागात एक ‘पिंक बुथ’ उभारण्यात येणार असून, या बुथवर प्रामुख्याने महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. तसेच निवडक मतदान केंद्रांवर पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि मतदानाचे महत्त्व या विषयांवर आधारित थीमॅटिक बुथ उभारून जनजागृती केली जाणार आहे.

संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडावी यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली.

# आईच्या शस्त्रक्रियेसाठी ठेवलेली रक्कम लंपास

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.4 )** – शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देउरवाडा (भोंगाडेपुरा) परिसरात आईच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी आणलेली रोख रक्कम व मोबाईल चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिरजगाव कसबा पोलिसांनी तातडीची कारवाई करत आरोपीस अटक केली आहे. देउरवाडा येथील रहिवासी नंदकिशोर रामदासराव तायडे (वय 35) यांनी याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, 2 जानेवारी रोजी आईच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी त्यांनी आणलेले 5 हजार रुपये रोख घरातील कपाटात ठेवले होते. तसेच चार्जिंगला लावलेला मोबाईलही घरातच होता. मात्र त्याच रात्री अज्ञात चोरट्याने ही रोख रक्कम व मोबाईल असा सुमारे 20 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तक्रार प्राप्त होताच शिरजगाव कसबा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान नितीन मधुकर सुसरे (वय 32, रा. महाराज चौक, देउरवाडा) याने चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अटक केली असून पुढील तपास शिरजगाव कसबा पोलीस करीत आहेत.

# नव्या नेतृत्वाचे स्वागत : चांदूर रेल्वे नगर परिषद कार्यालय सज्ज

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, ( दि.4 )** – नगर परिषद नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविणाऱ्या प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांच्या पदग्रहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर चांदूर रेल्वे नगर परिषद कार्यालयात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवार, दिनांक 5 जानेवारी रोजी होणाऱ्या पदग्रहण सोहळ्यासाठी ‘आपलं चांदूर’ व नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने भव्य आणि नियोजनबद्ध तयारी सुरू असून, नगर परिषद कार्यालयाचा चेहरामोहराच बदलतांना दिसत आहे.

नगर परिषद प्रांगणात होणाऱ्या या सोहळ्यासाठी कार्यालयाची रंगरंगोटी, स्वच्छता व डागडुजीची







कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. इमारतीच्या आतील व बाहेरील भागाला नव्या रंगसंगतीचा साज चढविण्यात येत असून, प्रवेशद्वार, जिने, सभागृह व परिसर आकर्षक पद्धतीने सजविण्यात येत आहे. दर्शनी भागात विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि स्वागत फलक उभारण्यात येणार असून, संपूर्ण परिसर उत्सवमय स्वरूपात नटणार आहे.

केवळ सौंदर्यीकरणावरच भर न देता, नगर परिषद प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख व्हावे, यासाठी काही मूलभूत बदलही अमलात आणले जात आहेत. नागरिकांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था, सूचना फलक, फाईल व्यवस्थापन प्रणाली तसेच स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जात आहे. यामुळे नगर परिषद कार्यालय केवळ देखणेच नव्हे, तर अधिक कार्यक्षम होणार असल्याचे चित्र आहे. प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांच्या विजयामुळे शहरात नव्या आशा आणि अपेक्षांचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण क्षेत्रातील अनुभव, सामाजिक बांधिलकी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे आगामी काळात नगर परिषदेच्या कारभारात सकारात्मक आणि लोकाभिमुख बदल घडतील, असा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत. या पदग्रहण सोहळ्यासाठी शहरातील नागरिक, विविध सामाजिक संस्था, राजकीय पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, हा सोहळा चांदूर रेल्वेच्या राजकीय व सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांचा आज पदग्रहण सोहळा

### नगर परिषद लोकाभिमुख करण्याचा निर्धार

नगर परिषद ही शहरातील जनतेच्या सेवेसाठी आहे. आतापर्यंत अधिकाऱ्यांच्या प्रभावाखाली राहिलेल्या नगर परिषदेत आता जनतेचा प्रभाव दिसून येईल. नगर परिषदेत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा मान–सन्मान राखणे ही आमची सामूहिक जबाबदारी राहील, असा ठाम निर्धार व्यक्त केला आहे.

**निलेश विश्वकर्मा,**
**आपलं चांदूर पॅनल**

# नेतृत्वावरील विश्वास उडाला?

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.4 )** – सन 2021 मध्ये महापालिकेच्या सभागृहाचा कार्यकाळ संपल्यानंतरही शहरातील मूलभूत प्रश्न कायम आहेत. कचरा व्यवस्थापन, तुंबलेल्या नाल्या आणि शहर स्वच्छतेसारखे प्रश्न तेव्हाही चर्चेत होते आणि आजही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हेच मुद्दे नागरिकांच्या केंद्रस्थानी आहेत. महापालिकेतील टोळक्यांचे राजकारण, अंतर्गत गटबाजी आणि स्वार्थी नेतृत्वामुळे बहुतांश नागरिकांचा राजकीय नेतृत्वावरील विश्वास उडाल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे यंदा अनेक मतदारांनी पक्षांपेक्षा उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व, काम करण्याची क्षमता आणि विश्वासार्हता पाहून मतदान करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांच्या प्रतिक्रियांतून स्पष्ट होत आहे. परिणामी, यंदाचा महापालिकेचा महासंग्राम अधिक चुरशीचा होण्याची चिन्हे आहेत.





निवडणूक चिन्हांचे वाटप होताच प्रचाराला वेग आला असून, यंदा अपक्षांपेक्षा राजकीय पक्षांचे वर्चस्व अधिक राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. निवडणूक प्रक्रियेने आता निर्णायक टप्पा गाठला आहे. शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी 159 उमेदवारांनी माघार घेतली. त्यानंतर पक्षीय व अपक्ष मिळून एकूण 661 उमेदवारांना अंतिम मान्यता देण्यात आली. शनिवारी सर्व उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप झाले असून, त्याचबरोबर प्रचारालाही जोरदार सुरुवात झाली आहे. या निवडणुकीत 22 प्रभागांतून 87 नगरसेवक निवडले जाणार आहेत.

### पक्षीय मांडणी स्पष्ट

निवडणूक यादीवरून राजकीय समीकरणे स्पष्ट झाली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार) 87 पैकी 85 जागांवर उमेदवार उभे केले आहेत. भाजपने 68 जागांवर उमेदवार दिले असून, 12 जागांसाठी युवा स्वाभिमान पक्षाशी युती केली आहे. युवा स्वाभिमान पक्षाने 42 उमेदवार दिले आहेत. काँग्रेसने उबाठा गट व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्यासोबत आघाडी करत 74 उमेदवार रिंगणात उतरवले आहेत.

### बंडखोरांची मळमळ जाईना

इतिहासात कधी घडले नसेल तसे यंदा काँग्रेस आणि विशेषत: भाजपच्या तिकीट वाटपात पहायला मिळाले. या दोन्ही प्रमुख पक्षांना बंडखोरांना समजाविण्यासाठी मोठे कष्ट घ्यावे लागले. अंतर्गत गटबाजी आणि टोळीवाद आवरण्याचे प्रयत्न झाले, तरी त्याचा अधिक फटका बसणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण पुन्हा पाच वर्षाकरिता राजकीय भविष्य अंधारात गेल्याने बंडखोरांची मळमळ कमी होताना दिसत नाही. दुसरीकडे मित्र पक्षासोबत भाजप ने केलेली तडजोडी भाजप कार्यकर्त्यांना जिव्हारी लागताना ठरत आहे.

### तोंड पाहून मतदानावर भर

### कचरा, तुंबलेल्या नाल्या व शहर स्वच्छता कळीचे मुद्दे

विशेष म्हणजे, यंदा निवडणूक रिंगणात पक्षीय उमेदवारांचे वर्चस्व ठळकपणे दिसून येत आहे. विविध राष्ट्रीय, राज्यस्तरीय व प्रादेशिक पक्षांचे मिळून 442 उमेदवार, तर 219 अपक्ष उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

त्यामुळे निकालांवर पक्षीय समीकरणांचा मोठा प्रभाव राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र तरीही नुसतं एका पक्षाला बहुमत दिल्यापेक्षा व्यक्तीपाहून मतदान करण्यावर जनतेचा कल दिसतोय. काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार), शिवसेनेचे दोन्ही गट, वंचित बहुजन आघाडी आदी पक्षांनी मोठ्या प्रमाणावर उमेदवार उभे केले आहेत.

# शक्ती महाराजांसह आंदोलनकर्त्यांवर गुन्हे

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.4 )** – भाजपच्या एका पदाधिकार्यांनी शक्ती महाराज यांच्याबद्दल अपमानास्पद शब्द वापरल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी अमरावतीत झालेल्या आंदोलनामुळे कार्यकर्त्यांना महागडे पडले. शहरात लागू असलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांचा भंग करत आंदोलन केल्याप्रकरणी 3 जानेवारी रोजी सिटी कोतवाली पोलिसांनी शक्ती महाराजांसह 25–30 कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भाजपमध्ये सध्या विधानसभा निवडणुकीसाठी तिकीट वाटपावरून मोठा घमासान सुरू आहे. या वादातून काही नाराज कार्यकर्त्यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना लक्ष्य केले. काही दिवसांपूर्वी राजापेठ चौक परिसरात कार्यकर्त्यांनी प्रवक्ते कुलकर्णी यांना घेरून तिकीट न मिळण्यामागचे कारण विचारले होते. यावेळी कुलकर्णी यांनी शक्ती महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. शुक्रवारी शक्ती महाराज यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी राजकमल चौकात जोरदार घोषणाबाजी केली, शिवराय कुलकर्णी यांच्या विधानाचा निषेध व्यक्त केला आणि त्यांचा राजीनामा मागितला. अमरावती शहरात 26 डिसेंबर ते 11 जानेवारी या कालावधीत पोलीस आयुक्तांनी कलम 144 अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले होते. या आदेशाचे उल्लंघन करून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता आंदोलन केल्याचे ठपका पोलिसांनी ठेवले. सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे पीएसआय तुषार गावंडे यांच्या तक्रारीवरून शक्ती महाराज, संगम गुप्ता, सचिन डाके यांच्यासह इतर 25क्क30 कार्यकर्त्यांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भाजप विरोधी निदर्शने भोवले

# बांगलादेशात १५ दिवसांत चौथ्या हिंदूचा मृत्यू

**■ वृत्तसंस्था, बांगलादेश, दि. ४:**

बांगलादेशात हिंसाचारात चौथ्या हिंदूचा मृत्यू झाला. 50 वर्षीय व्यावसायिक खोकन चंद्र दास यांच्यावर 31 डिसेंबर रोजी धारदार शस्त्रांनी हल्ला करण्यात आला होता. शनिवारी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

खोकन यांच्यावर तेव्हा हल्ला करण्यात आला, जेव्हा ते शरियतपूर जिल्ह्यातील दामुद्या परिसरात केउरभांगा बाजाराजवळ आपले दुकान बंद करून घरी परतत होते.

मीडिया रिपोर्टनुसार, हल्लेखोरांनी त्यांना बेदम मारहाण केली, धारदार शस्त्राने हल्ला केला आणि नंतर पेट्रोल टाकून आग लावली होती. जीव वाचवण्यासाठी त्यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या तलावात उडी मारली, त्यानंतर स्थानिक लोकांनी आरडाओरडा केला. हल्लेखोर घटनास्थळावरून पळून गेले होते.

स्थानिक लोकांनी त्यांना शरियतपूर सदर रुग्णालयात पोहोचवले, जिथून त्यांची प्रकृती गंभीर असल्याने ढाकाला रेफर करण्यात आले. ढाकामध्ये 3 दिवस त्यांच्यावर उपचार सुरू होते, परंतु शरीर जास्त भाजल्यामुळे त्यांना वाचवता



आले नाही. बांगलादेशात 15 दिवसांच्या आत 4 हिंदूंची हत्या करण्यात आली आहे. 18 डिसेंबर रोजी दीपू चंद्र दास यांच्या हत्येनंतर 24 डिसेंबर रोजी जमावाने 29 वर्षीय अमृत मंडल उर्फ सम्राट यांची मारहाण करून हत्या केली होती.

त्यानंतर 29 डिसेंबर रोजी मैमनसिंह जिल्ह्यात 42 वर्षीय कापड कारखान्यातील कर्मचारी बजेंद्र बिस्वास यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

# पहिल्या दिवशी ४५ षटकांचाच खेळ

**■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. ४:**

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातील ॲशेस 2025-26 चा पाचवा म्हणजेच अंतिम कसोटी सामना सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळला जात आहे. पहिल्या दिवशी पाऊस आणि खराब प्रकाशामुळे केवळ 45 षटकांचा खेळ होऊ शकला.

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत संघाने 3 गडी गमावून 211 धावा केल्या आहेत. जो रूट (72) आणि हॅरी ब्रूक (78) नाबाद परतले. दोघांमध्ये 154 धावांची अभेद्य भागीदारी झाली आहे. दुस?्या दिवसाचा खेळ सोमवारी सकाळी भारतीय वेळेनुसार 4:30 वाजता सुरू होईल.




इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो योग्य ठरत आहे. इंग्लंडचे सुरुवातीचे 3 बळी लवकर पडले होते. 57 धावांवर इंग्लंडचे 3 बळी पडले होते. त्यानंतर जो रूट आणि हॅरी ब्रूकने इंग्लंडचा डाव सांभाळला. पहिल्या दिवशी इंग्लंडची धावसंख्या 211 धावा होती. रूट आणि ब्रूक दोघेही अर्धशतके झळकावून नाबाद परतले.

# टी-२० विश्वचषकासाठी बांगलादेश संघाची घोषणा

## लिटन दास कर्णधार, तस्कीनला संधी, जाकेर अली बाहेर

**■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. ४:**

बांगलादेशने मेन्स टी-20 वर्ल्ड कप 2026 साठी आपल्या 15 सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. लिटन दास कर्णधारपदी कायम राहणार आहे, तर वेगवान गोलंदाज तस्कीन अहमदचे संघात पुनरागमन झाले आहे. तस्कीन अलीकडेच आयर्लंड मालिकेतून बाहेर होता.

तर, झाकेर अलीला संघात संधी मिळालेली नाही. झाकेर अलीला मार्च 2024 नंतर पहिल्यांदाच टी-20 संघातून वगळण्यात आले आहे. या काळात बांगलादेशने खेळलेल्या सर्व 45 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये झाकेरचा समावेश होता. मात्र, त्याची अलीकडील कामगिरी कमकुवत राहिली होती. खराब फॉर्ममुळे त्याला इतर फॉरमॅटच्या संघांतूनही वगळण्यात आले होते.

टी-20 वर्ल्ड कप 7 फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंकेत खेळवला जाणार आहे. बांगलादेशला ग्रुप स्टेजमधील आपले सर्व चार सामने भारतातच खेळायचे आहेत. तीन सामने कोलकाताच्या ईडन गार्डन्स मैदानावर आणि एक सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आहे.

टी-20 विश्वचषक 2026 साठी बांगलादेश संघ

लिटन दास, सैफ हसन, तंजीद हसन, परवेज हुसेन इमोन, तौहीद हृदॉय, शमीम हुसेन, नुरुल हसन , मेहदी




हसन, रिशाद हुसेन, नसुम अहमद, मुस्तफिजुर रहमान, तंजीम हसन साकिब, तस्कीन अहमद, मोहम्मद सैफुद्दीन, शोरिफुल इस्लाम.

चांगल्या फॉर्ममध्ये असलेले लिटन दास, तंजीद हसन आणि सैफ हसन संघाच्या टॉप ऑर्डरची जबाबदारी सांभाळतील. मधल्या फळीत तौहीद हृदॉय, शमीम हुसेन आणि नुरुल हसन यांना स्थान देण्यात आले आहे. तसेच, परवेज हुसेन इमोनला चौथ्या क्रमांकावरही आजमावले जाऊ शकते. त्याने सध्याच्या बांगलादेश प्रीमियर लीग मध्ये या स्थानावर चांगली कामगिरी केली आहे.

बांगलादेशची सर्वात मोठी ताकद त्याची गोलंदाजी मानली जात आहे. वेगवान गोलंदाजीच्या हल्ल्यात तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान, तंजीम हसन साकिब, शोरिफुल इस्लाम आणि मोहम्मद सैफुद्दीन यांचा समावेश आहे. फिरकी गोलंदाजीची कमान रिशाद हुसेन सांभाळतील. त्यांच्यासोबत डावखुरा फिरकी गोलंदाज नसुम अहमद आणि ऑफ-स्पिनर मेहदी हसन देखील असतील.

बांगलादेश क्रिकेट बोर्ड 2026 च्या टी-20 विश्वचषकात भारतात होणारे आपले सामने श्रीलंकेत खेळवण्याची मागणी करू शकते. यासाठी बोर्ड आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद ला पत्र लिहिण्याच्या तयारीत आहे. बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिजुर रहमानला आयपीएल 2026 मधून वगळल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

टी-20 विश्वचषक 2026 च्या गट टप्प्यात एकूण 20 संघ समाविष्ट आहेत, ज्यांना 4 वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले गेले आहे. प्रत्येक संघ आपल्या गटात 4 लीग सामने खेळेल. लीग टप्प्यानंतर प्रत्येक गटातून 2-2 अव्वल संघांना सुपर-8 टप्प्यात प्रवेश मिळेल.

गट-सी मधील बांगलादेश आणि गट-डी मधील अफगाणिस्तानचा गट सर्वात कठीण दिसत आहे, कारण यात इंग्लंड, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांचा समावेश आहे. चारही संघांना अंतिम सामना खेळण्याचा अनुभव आहे, तर बांगलादेश आणि अफगाणिस्तान कधीही कोणत्याही विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचू शकले नाहीत.

# वनडे मालिकेत भारताची प्लेइंग-११ काय असेल

## कोण बसेल बाहेर?




**■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. ४:**

न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा झाली आहे. कर्णधार शुभमन गिलसोबत उपकर्णधार श्रेयस अय्यरनेही संघात पुनरागमन केले आहे. तर वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजलाही संघात संधी देण्यात आली आहे. श्रेयसला अजून फिटनेस क्लिअरन्स मिळालेला नाही, त्यामुळे त्याचे प्लेइंग-11 मध्ये स्थान मिळणेही कठीण आहे.

कर्णधार शुभमन गिलच्या पुनरागमनामुळे भारताचा टॉप ऑर्डर पुन्हा एकदा निश्चित झाला आहे. गिल माजी कर्णधार रोहित शर्मासोबत सलामीला फलंदाजी करताना दिसेल. तर वनडे इतिहासात सर्वाधिक शतके झळकावणारा विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करेल. कोहलीने वनडेच्या मागील 4 डावांमध्ये प्रत्येक वेळी 50 पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.


विराट कोहली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील दुसरा सर्वोच्च धावसंख्या करणाऱ्या खेळाडू बनण्याच्या जवळ आहे. त्याच्या नावावर 556 सामन्यांमध्ये 27,975 धावा आहेत. 25 धावा करताच तो 28 हजार धावा करणारा तिसरा खेळाडू बनेल.

# सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलचा रुग्णांच्या जीवनात सकारात्मक बदल

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :**

कर्करोग हा आजच्या काळातील एक गंभीर आणि आव्हानात्मक आजार आहे. वैद्यकीय प्रगतीमुळे उपचार पद्धती प्रभावी झाल्या असल्या, तरी कर्करोगाशी संबंधित सामाजिक दृष्टीकोन अजूनही अनेक गैरसमज, भीती आणि पूर्वग्रहांनी ग्रासलेला दिसून येतो. कर्करोग हा केवळ शारीरिक आजार नसून तो रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबाच्या मानसिक, सामाजिक व भावनिक आयुष्यावर खोल परिणाम करणारा अनुभव असतो.

कर्करोग रुग्णांसोबत काम करताना असे वारंवार जाणवते की अनेक रुग्णांना समाजाकडून, नातेवाईकांकडून, शेजा?यांकडून तसेच कधी कधी स्वतःच्या कुटुंबीयांकडूनही भेदभाव आणि दूर ठेवण्याचा अनुभव येतो. काही लोकांमध्ये अजूनही असा गैरसमज आहे की कर्करोग हा संसर्गजन्य आजार आहे, किंवा कर्करोग




झालेल्या व्यक्तीशी संपर्क ठेवल्यास काही धोका होऊ शकतो. या चुकीच्या समजुतींमुळे रुग्ण सामाजिकदृष्ट्या एकाकी पडतात. कर्करोगामुळे शरीरातील बदल, केस गळणे, वजन कमी होणे, थकवा, उपचारांचे दुष्परिणाम यामुळे रुग्णांचा आत्मसन्मान आणि शरीरप्रतिमेवर मोठा परिणाम होतो. यासोबतच समाजाकडून मिळणारी उपेक्षा, दुर्लक्ष किंवा टाळाटाळ ही मानसिक वेदना अधिक तीव्र करते. अनेक रुग्ण सांगतात की आजाराच्या काळात सर्वात जास्त गरज असते ती भावनिक आधाराची - कुणीतरी आपल्याशी बोलावे, ऐकून घ्यावे, आपलेपणाने विचारपूस करावी.

एका समूह सत्रादरम्यान एका रुग्णाने अनुभव सांगितला की आजारपणात त्यांनी नातेवाईकांना फोन केला, पण अनेक वेळा फोन उचलला गेला नाही. काहींना वाटते की रुग्ण फोन करतो म्हणजे आर्थिक मदत मागणार असावा. प्रत्यक्षात मात्र अनेक वेळा रुग्ण फक्त मन मोकळे करण्यासाठी, थोडेसे धीर देणारे शब्द ऐकण्यासाठी संपर्क साधत असतात. अशा वेळी मिळणारे दुर्लक्ष त्यांना अधिक एकाकी आणि मानसिकदृष्ट्या खचलेले बनवते.

कर्करोगाशी लढताना औषधोपचार जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच महत्त्व मानसिक आरोग्य, सामाजिक आधार आणि स्वीकार यांना आहे. संशोधनातूनही स्पष्ट होते की ज्या रुग्णांना कुटुंब, मित्र आणि समाजाचा भावनिक पाठिंबा मिळतो, त्यांची उपचारांप्रती सकारात्मकता वाढते, ताण-तणाव कमी होतो आणि जीवनमान सुधारते.

म्हणूनच समाज म्हणून आपली जबाबदारी आहे की आपण कर्करोगाकडे भीतीने किंवा गैरसमजांनी न पाहता संवेदनशीलतेने आणि माणुसकीने पाहिले पाहिजे. कर्करोग रुग्णांना समाजातून वेगळे न करता त्यांचा समावेश करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांना संवाद, सन्मान आणि आधार देणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे.

कलंक आणि भेदभाव दूर करण्यासाठी जनजागृती, खुले संवाद, मानसिक आरोग्याविषयी शिक्षण आणि अनुभवकथन यांची गरज आहे. कर्करोग हा कोणाच्याही आयुष्यात येऊ शकणारा आजार आहे; तो कोणाचाही दोष नाही. रुग्णाला केवळ उपचारांची नाही, तर समजून घेणा?या समाजाचीही तितकीच गरज असते.

सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलचे ध्येय एक विश्वासार्ह संस्था म्हणून उभे राहणे आहे जी जगण्याची क्षमता सुधारून, जीवनाची गुणवत्ता वाढवून आणि रुग्णांना आणि कुटुंबांना त्यांच्या कर्करोगाच्या प्रवासात आधार देऊन कर्करोग काळजीमध्ये बदल घडवून आणणे.

सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये कर्करोगाचा प्रकार किंवा टप्पा काहीही असो, सन्मानाने आणि आशेने वेळेवर, वैयक्तिकृत आणि बहु-विद्याशाखीय उपचार मिळावे; म्हणून सर्वसमावेशक उपचार; म्हणजेच किमो, शस्त्रक्रिया, विकिरण यासोबत भौतिकोपचार, आहार, मानसशास्त्र हे महत्वाचे घटक रुग्णाच्या सर्वांगीण विकासासाठी व सकारात्मक परिणामांसाठी गेली ४ वर्ष कार्यरत आहोत

# भारताचा बांगलादेश दौरा रद्द होऊ शकतो

**■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. ४:**

भारताचा बांगलादेश दौरा रद्द होऊ शकतो. दोन्ही देशांमधील सतत वाढत असलेल्या राजकीय तणावामुळे ही मालिका थंड बस्त्यात जाऊ शकते. सूत्रांनुसार, बीसीसीआय यावेळीही आपला संघ बांगलादेशात पाठवण्याच्या मनस्थितीत नाही.

एक दिवसापूर्वी शुक्रवारी बांगलादेश बोडार्ने सप्टेंबरमध्ये 6 सामन्यांच्या व्हाईट बॉल मालिकेची घोषणा केली होती. बीसीबी चे म्हणणे होते की, तारखा निश्चित करण्यापूर्वी बीसीसीआयशी चर्चा करण्यात आली होती. प्रस्तावित वेळापत्रकानुसार, भारतीय संघ 28 ऑगस्ट रोजी बांगलादेशात पोहोचेल. त्यानंतर 1, 3 आणि 6 सप्टेंबर रोजी तीन एकदिवसीय सामने खेळले जातील. यानंतर 9, 12 आणि 13 सप्टेंबर रोजी तीन टी-20 सामने ठेवण्यात आले आहेत.

बीसीसीआयने नकार दिल्यानंतर बांगलादेश क्रिकेट बोडार्ने तातडीची




बैठक बोलावली आहे, ज्यात पुढील रणनीतीवर चर्चा होईल. यापूर्वीही भारताने दोन्ही देशांमधील वाढलेल्या तणावामुळे आपला बांगलादेश दौरा रद्द केला होता.

इतकंच नाही, तर बीसीसीआयच्या प्रतिनिधींनी ढाका येथे होणा?या आशियाई क्रिकेट परिषदेच्या बैठकांना जाण्यासही नकार दिला होत. भारतीय बोर्डकडून अद्याप या दौ?यासाठी सहमतीचे संकेत मिळालेले नाहीत. असे मानले जात आहे की बांगलादेशात गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेली राजकीय हिंसा आणि अस्थिरता इउउक ची सर्वात मोठी चिंता आहे. यापूर्वी गेल्या वर्षीही सुरक्षा कारणांमुळे ही मालिका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली होती.

बोर्डाच्या निदेर्शानुसार कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला रिलीज केले. पुढील महिन्यात बांगलादेशला भारतात टी-२० विश्वचषकाचे सामने खेळायचे आहेत.

# आज का अंदाज

## सोमवार ५ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| ३ - ६ - ९ - ० | ३ - ४ - ७ - ८ |
| १३९ - १२३ - ४५० - २३५ | २४७ - २६६- १७९ - १३४ |
| २३८ - २६८ - ३६० - ३७० | ३४६ - ३३८- २७८ - २६० |
| ३३७ - ३६७ - २७० - ४६० | ४९० - ४४६ - ३७७ - ३५० |
| जोडी | जोडी |
| ३१ - ६१ - ९४ - ०४ | ३९ - ४९ - ७१ - ८१ |
| ३२ - ६२ - ९७ - ०७ | ३० - ४० - ७५ - ८५ |
| ३८ - ६८ - ९५ - ०५ | ३६ - ४६ - ७२ - ८२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ५ जानेवारी

## सोमवार ५ जानेवारी २०२६

सर्व बाजार साठी

१० - ४० - ५३ - ८३
१६ - ४६ - ५७ - ८७
१२ - ४२ - ५९ - ८९
-----------------------------
११९ - १६७ - १६८ - १८९
४७० - २५७ - ६९० - ३७८
५६० - ३५६ - ७८० - २२४

**सर्व बाजारांसाठी**

| सोम. ते बुध. ओपन डे | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| २८० | ६०० | २५५ | ६९० | ३५० | २६६ |
| ३७० ० | १२३ ६ | ४८० २ | ७९९ ५ | ४४० ८ | ६९९ ४ |
| ४६० | २६८ | ३९० | ४४७ | ५५८ | ७८९ |

**सर्व बाजारांसाठी**

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८० | १४९ | ३४६ | २५६ | १९० | ४५० |
| ४७० १ | २४८ ४ | ५८० ३ | ६८९ ३ | २९९ ० | ३६० ९ |
| ५६० | ३४७ | ४९० | ५८० | ३८९ | २७० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

४ - ५ - ६ - ७ - ८

जबरदस्त पास होणारे चान्सेस
प्रो. बालाजी कुमार 9822486034

# आजचे राशिभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे पार करण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी तुमचा दिवस चांगला जाईल. जीवन आनंदी राहील.

**वृषभ :** विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल. एखाद्या प्रतिष्ठित कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळण्याची शक्यता आहे. महत्वाच्या निर्णयाला घरच्यांकडून पाठिंबा मिळेल.

**मिथुन :** आज तुम्ही नवीन व्यवसायाची योजना देखील आखाल. महत्वाच्या निर्णयामध्ये तुम्हाला कुटुंबातील सदस्यांकडून पाठिंबा मिळेल. लांबच्या प्रवासाची योजना आखू शकता.

**कर्क :** संयम ठेवा आणि संवादातून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करा. मतभेदांमुळे मानसिक अस्वस्थता येऊ शकते. हे अनुभव तुम्हाला महत्त्वाचे धडे देतील. प्रकृतीला जपा.

**सिंह :** जोडीदारासोबत संवाद गोड आणि मनापासून होईल. जुन्या मित्रांशी भेट होऊ शकते. खुले मन ठेवा. तुम्ही तुमच्या भावना स्पष्टपणे व्यक्त करू शकाल, ज्यामुळे नाती अधिक दृढ होतील.

**कन्या :** संवेदनशील विषयांवर बोलताना काळजी घ्या. शांत राहणे महत्त्वाचे आहे. भावना समजून घ्या आणि कुटुंबीय वा मित्रांशी मोकळेपणाने बोला. नकारात्मकता टाळा.

**तूळ :** आजचा दिवस थोडा कठीण असू शकतो. आध्यात्मिक आणि वैयक्तिक प्रगतीत काही अडथळे येऊ शकतात. आत्मपरीक्षणाचा हा काळ आहे. नात्यांमध्ये चढ-उतार संभवतात.

**वृश्चिक :** प्रकृतीकडे लक्ष पुरवा.आज इतरांना मदत केल्याने फायदा होईल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांनी अधिक मेहनत घेणे आवश्यक आहे. कामात निष्काळजीपणा केल्यास नुकसान होईल.


**धनु :** तुमच्या जोडीदारासोबत बाहेरचा आनंद घ्या. परिस्थितीबाबत संभ्रम जाणवेल. नात्यांमध्ये चढ-उतार होऊ शकतात. संयम ठेवा; परिस्थिती हळूहळू सुधारेल. सकारात्मकतेकडे वाटचाल करा.

**मकर :** आजचा दिवस विशेष शुभ आहे. भावनिक नाती अधिक घट्ट होतील. आजचा दिवस अतिशय शुभ आहे. समृद्धी आणि आत्मविश्वास वाढेल.

**कुंभ :** तुमचे मन ताजेतवाने होईल. कलांमध्ये रस असलेल्यांना हा दिवस अनुकूल वाटेल. तुमच्या कलेची प्रशंसा देखील होऊ शकते.

**मीन :** आज तुम्ही लोकांशी अधिक चांगले नाते निर्माण कराल आणि स्वतःला सकारात्मक आणि यशस्वी वाटेल.आत्मविश्वास आणि संवेदनशीलता प्रियजनांशी जवळीक वाढवेल.

# शब्दकोडे क्रमांक २३१८



**आडवे शब्द :-**

१) एखाद्याचे समर्थन करणारा
४) पश्चिम भारतातील दोन राज्ये
१०) धुंदी, कैफ
११) थापा मारणारा
१४) पर्वत
१५) दृष्टी
१६) अखंड
१८) मिठाई तयार करणारा
१०) रात्र
२१) मद्य, दारु
२३) खबदाडी
२४) आश्वासन (हिं.)
२५) समीक्षा, विरुद्ध मत
२७) अफवा
२९) भारवाहक
३०) सिद्धता
३१) लहान मूल
३३) एक पाताळ
३५) उत्सवाचा दिवस
३६) पराक्रमाचा बिल्ला
३९) विचार मांडण्यासाठी बोलवलेली बैठक
४०) दरवळ
४२) मत्स्य
४४) एक उबदार उंची वस्त्र
४५) संतापी
४७) ढीग
४८) पदर
५०) चुलता
५१) पुष्परस
५२) मृगजळ
५४) अटीची भाषा
५५) पंजा आणि बाहू यांना जोडणारा अवयव
५७) चामखीळ
५९) अरण्य
६१) नवा कोरा
६३) जन्म-मृत्यू
६६) शक्तिशाली
६९) रस्ता
७०) वर-वधुची मिरवणूक
७१) रममाण, निमग्न
७२) वजनदार

**उभे शब्द:-**

१) खळबळजनक वृत्त
२) दिवटी
३) कहाणी
४) राजमहाल
५) ठिकाण, जागा
६) हवालदार
७) जन्मदात्री
८) गवंडी
९) स्तुती
१२) पोशाख
१३) एक कडवे द्विदल धान्य
१७) हिंदीत डिंक
२०) कलाबूत
२२) दीपक
२३) जास्तीत जास्त
२४) व्यर्थ
२६) आजच्या आधीचा दिवस
२८) कोवळा अंकुर
२९) दुर्दैवी
३०) गवताची झोपडी
३२) बशीचा जोडीदार
३४) मामंजी
३५) सारखा
३७) गत, अवस्था
३८) एकत्रित आवाजांचा गोंधळ
४१) कानोसा घेण्यासाठी कान ताठ करणे
४३) अत्यंत दुष्ट माणूस
४६) पत्र
४९) भार, माप
५०) सापाने टाकलेली त्वचा
५२) विश्व, दुनिया
५३) युद्ध
५६) नेत्र, लोचन
५८) एक प्रकारचे लोकरीचे कापड
५९) रात्रभर
६०) रात्री प्रकाशणारा किडा
६१) दया, कींव
६२) ध्वनी
६४) अभिनेता
६५) नंतर
६७) अभिप्राय
६८) गरज

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कैद्याच्या पेन ड्राइव्हमध्ये कारागृहाचे सीसीटीव्ही फुटेज

## अमरावती मध्यवर्ती कारागृहातील प्रकरणाने खळबळ | अंतर्गत मदतीचा संशय

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.4 )** – अमरावती मध्यवर्ती कारागृहात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याच्या ताब्यात सापडलेल्या पेन ड्राइव्हमध्ये कारागृहातील सीसीटीव्ही फुटेज आढळल्याने पोलिस व गृह विभागाचे लक्ष वेधले गेले आहे. प्राथमिक तपासात, कोणतीही अंतर्गत मदत नसताना कैद्याला अशी गोपनीय फुटेज मिळवणे जवळजवळ अशक्य असल्याचे स्पष्ट झाले असून, यामागे खोलवर कट रचला गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



फ्रेजरपुरा पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू करत तुरुंग प्रशासन, तांत्रिक कर्मचारी तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी हाती घेतली आहे. जप्त पेन ड्राइव्हची फॉरेन्सिक तपासणी करण्यात येणार असून, कोणत्या संगणकावरून व कोणत्या वापरकर्ता आयडीद्वारे डेटा कॉपी करण्यात आला, याचा शोध घेतला जाणार आहे. या प्रकरणातील आरोपी कैदी सागर उर्फ मुकेश विठ्ठल बारब्दे असून तो जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. त्याची चौकशी करण्यासाठी गृह मंत्रालयाच्या सचिवांकडे औपचारिक परवानगी मागण्यात आली आहे. परवानगी मिळाल्यानंतर पोलिस पथक तुरुंगात जाऊन सविस्तर चौकशी करणार असून, पेन ड्राइव्हवरील फुटेज आरोपीसमोर दाखवले जाणार आहे.

### आरोपीला झाली होती 30 दिवसांची रजा मंजूर

प्राथमिक तपासात असेही समोर आले आहे की, आरोपीला 13 डिसेंबर 2025 रोजी 30 दिवसांची रजा मंजूर करण्यात आली होती. रजेपूर्वी करण्यात आलेल्या झडतीदरम्यान त्याच्याकडे पेन ड्राइव्ह सापडल्याने तुरुंग प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. हा पेन ड्राइव्ह आरोपीकडे किती काळ होता आणि याआधीही गोपनीय माहिती बाहेर पाठवण्यात आली होती का, याचीही चौकशी सुरू आहे.

### तुरुंग प्रशासनाकडून चुप्पी

एवढ्या गंभीर प्रकरणात अद्याप तुरुंग प्रशासनाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. वरिष्ठ पोलिस व गृह विभागातील अधिकारीही या प्रशासकीय मौनाबद्दल अस्वस्थ असल्याचे चित्र आहे. तज्ज्ञांच्या मते, तातडीने ठोस कारवाई न झाल्यास हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता आहे. गृह मंत्रालयाच्या सचिवांची परवानगी मिळाल्यानंतर आरोपीच्या चौकशीसह आवश्यक ती न्यायालयीन मंजुरी घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

# सावळा येथे अवैध सावकारावर छापा

## दोन विशेष पथकांची कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे,( दि.4 )** – धामणगाव रेल्वे तालुक्यातील सावळा येथे अवैध सावकारीबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या आधारे शुक्रवारी जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या निर्देशानुसार दोन विशेष तपास पथकांनी मोठी कारवाई केली. ही छापेमारी सकाळी 10.35 वाजता सुरू होऊन दुपारी 3.30 वाजेपर्यंत सुरू होती.

सहाय्यक निबंधक स्वाती गुडधे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अवैध सावकार गोपाळ टेकाडे यांच्या निवासस्थानी छापा टाकला. या कारवाईत दोन वाहनांच्या आरसी बुक, 22 कोरे धनादेश (चेक), 27 कोरे स्टॅम्प तसेच 45 स्थावर मालमत्तेसंबंधी कागदपत्रांसह एकूण 96 संशयित दस्तऐवज तपासणीसाठी जप्त करण्यात आले. तर सहाय्यक निबंधक सचिन पंतगे यांच्या नेतृत्वाखालील दुसऱ्या पथकाने टेकाडे यांच्या शेतजमिनी व अन्य ठिकाणी छापेमारी केली. या वेळी अवैध सावकारीशी संबंधित संशयाच्या आधारे 27 प्रकारची कृषी अवजारे व वाहने जप्त करण्यात आली असून, त्यामध्ये ट्रॅक्टर, पेराई मशीन, ट्रॅक्टर ट्रॉली, बोलेरो तसेच इतर उपकरणांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रे व साहित्याची सखोल तपासणी सुरू असून, तपासाअंती संबंधितांवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



# अती थंडीचा फटका; तुरीच्या पिकावर दह्या व्हायरसचे संकट

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.4 )** – जिल्ह्यातील काही भागात यंदा अचानक वाढलेल्या अती थंडीमुळे खरीप हंगामातील मुख्य पीक असलेल्या तुरीवर मोठे संकट ओढावले आहे. सध्या तुरीचे पीक दाणे भरण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या अवस्थेत असतानाच थंडीचा तीव्र परिणाम झाल्याने 'दह्या' या व्हायरसचा प्रादुर्भाव वाढल्याचे दिसून येत आहे. या आजारामुळे तुरीच्या झाडांची पाने मोठ्या प्रमाणात गळून पडत असून पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम होत आहे. पाने गळाल्याने प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया मंदावली असून त्यामुळे दाणे भरण्याची प्रक्रिया अडथळ्यात आली आहे. अनेक ठिकाणी शेंगांमधील दाणे पूर्ण विकसित न होता लहान व बुटके राहत आहेत. परिणामी तुरीचे उत्पादन लक्षणीयरीत्या घटण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषत: अचलपूर तालुक्यात या व्हायरसचा प्रादुर्भाव सर्वाधिक असल्याचे निदर्शनास येत आहे. साधारणपणे एकरी 8 ते 10 क्विंटल उत्पादन देणारी तूर यंदा केवळ 2 ते 3 क्विंटलपर्यंतच मर्यादित राहण्याची शक्यता शेतकरी वर्तवत आहेत. उत्पादन खर्च वाढलेला असताना अपेक्षित उत्पन्न मिळणार नसल्याने शेतकरी वर्ग हतबल झाला आहे. अचलपूर तालुका हा तूर उत्पादनासाठी ओळखला जातो. अनेक शेतकऱ्यांनी महागडी बियाणे, खते व औषधांवर मोठा खर्च केला असतानाही नैसर्गिक आपत्तीमुळे पीक वाचवणे कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने नुकसानग्रस्त क्षेत्रांचा पंचनामा करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत तसेच पीक विम्याचा लाभ द्यावा.

# विनापरवाना सभा, मेळावे, उपोषण, धरणे बंद

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.4 )**–अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. 17 प्रभागांसाठी 15 जानेवारी रोजी मतदान होणार असून, निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. राज्य निवडणूक आयोगाने 15 डिसेंबर रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) 2023 मधील कलम 163 (पूर्वीचे कलम 144) अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शासकीय कार्यालये व शासकीय विश्रामगृहांच्या परिसरात कोणत्याही प्रकारची आंदोलने, निदर्शने, बेकायदेशीर जमाव, घोषणाबाजी तसेच ध्वनिक्षेपकांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच विनापरवाना सभा, मेळावे, सार्वजनिक कार्यक्रम, उपोषण, धरणे किंवा मिरवणुका काढण्यास मनाई करण्यात आली आहे. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये व प्रशासनाच्या कामकाजात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी हे आदेश लागू करण्यात आले आहेत. या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

**आचारसंहितेमुळे कलम 163 लागू**

# ऑनलाईन कामांच्या जाचाविरोधात शिक्षकांचा एल्गार

## शिक्षकांना शिकवू द्या, विद्यार्थ्यांना शिकू द्या!

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.4 )**– राज्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांवर लादण्यात आलेल्या ऑनलाईन कामांच्या अतिरेकामुळे शिक्षक संघटना आक्रमक झाल्या असून, या जाचातून मुक्तता न झाल्यास राज्यव्यापी बहिष्कार छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना सविस्तर निवेदन सादर करून तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत.

शिक्षकांना शिकवू द्या आणि विद्यार्थ्यांना शिकू द्या, अशी ठाम भूमिका मांडत प्रशासकीय कामांसाठी शिक्षकांच्या खाजगी मोबाईलचा व वैयक्तिक वेळेचा होत असलेला गैरवापर थांबवण्याची मागणी राज्याध्यक्ष विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी केली असल्याची माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली. सध्या शाळांमध्ये प्रत्यक्ष अध्यापनापेक्षा विविध पोर्टल, लिंक आणि ॲप्सवर माहिती भरण्यालाच अधिक प्राधान्य दिले जात असल्याचे वास्तव समितीने अधोरेखित केले आहे. यु-डायस, शालार्थ प्रणाली, दैनंदिन पोषण आहार नोंदी तसेच विद्या समीक्षा केंद्र अंतर्गत 'स्मार्ट उपस्थिती'चॅटबॉटवर माहिती भरण्याची सक्ती शिक्षकांसाठी असह्य ठरत आहे. ग्रामीण भागात इंटरनेटची अपुरी सुविधा आणि मोबाईलची मर्यादित साठवणूक क्षमता असतानाही प्रशासनाकडून सतत दबाव टाकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी, प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ कमी होऊन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे. शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदींना बगल देणारा 15 मार्च 2024 चा शासन निर्णय, तसेच 'निपुण महाराष्ट्र'सारख्या मोहिमांत खाजगी संस्थांच्या सदोष ॲप्सचा वापर शिक्षकांचे मनोबल खच्ची करत असल्याचे निवेदनात नमूद आहे.



शिक्षक संख्या कमी असताना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांअभावी सर्व प्रशासकीय भार शिक्षकांवर टाकला जात असल्याने त्यांचे वैयक्तिक आयुष्यही तणावग्रस्त झाले आहे. या समस्येवर उपाय म्हणून शाळा स्तरावरील सर्व ऑनलाईन कामांसाठी समूह साधन केंद्र अथवा शाळा स्तरावर स्वतंत्र 'डेटा एन्ट्री ऑपरेटर'ची नेमणूक करण्याची मागणी पुन्हा करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेऊन शिक्षक संघटनांशी चर्चा करावी, अन्यथा संपूर्ण राज्यात ऑनलाईन कामांवर बहिष्कार टाकून खाजगी मोबाईलचा वापर बंद करण्याची चळवळ उभी केली जाईल, असा सज्जड इशारा शिक्षक समितीने दिला आहे. आम्ही तंत्रज्ञानाच्या विरोधात नाही. मात्र, तंत्रज्ञानाचा अतिरेक अध्यापनाच्या मुळावर येत असेल तर तो सहन केला जाणार नाही. असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले.

# सुधीर केने यांना राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार

महासागर | प्रतिनिधी

**चांदुर रेल्वे,( दि.4 )**– शिव प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने तालुक्यातील मालखेड रेल्वे येथील वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालयात कार्यरत असणारे शिक्षक सुधीर पंजाबराव केने यांची राज्यस्तरीय महाराष्ट्र आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार 2025 साठी निवड करण्यात आली आहे.

समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य तसेच सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. शिव प्रतिष्ठानने पाठविलेल्या पत्राद्वारे केने सरांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या प्रयत्नांतून अनेकांना नवी दिशा व उमेद मिळाल्याचेही पत्रात स्पष्ट केले आहे.



या पुरस्काराचा वितरण सोहळा 22 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11 वाजता, समर्थ मंगल कार्यालय पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सुधीर केने हे माहिती अधिकार कायद्याचे राज्य प्रशिक्षक असून त्यांचे चार पुस्तकही प्रकाशित झाले आहेत.दूरदर्शन व आकाशवाणीवरही त्यांचे कार्यक्रम झाले आहेत.

# आरएनआयच्या प्रेस नियमात बदल करण्याची मागणी

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे निवेदन

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, ( दि. 4 )** – प्रेस रजिस्ट्रार ऑफ इंडिया (आरएनआय) यांनी वृत्तपत्रांसाठी लागू केलेले नवीन प्रेस नियम अन्यायकारक असून त्यामध्ये तातडीने बदल करण्यात यावेत, अशी मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाने केली आहे. यासंदर्भात संघटनेने प्रेस रजिस्ट्रार, नवी दिल्ली यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

डेप्युटी रजिस्ट्रार प्रेस जनरल, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी 11 डिसेंबर रोजी काढलेल्या आदेशानुसार, वृत्तपत्र प्रकाशित झाल्यानंतर 48 तासांच्या आत त्याची इलेक्ट्रॉनिक प्रत प्रेस पोर्टलवर अपलोड करणे तसेच संबंधित महिन्याच्या 5 तारखेपर्यंत छापील अंक कार्यालयात पाठवणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये अद्यापही अनियमित वीजपुरवठा, नेटवर्कची समस्या तसेच प्रेस पोर्टलची संथ कार्यप्रणाली यामुळे अनेक वृत्तपत्र प्रकाशकांना या नियमांची पूर्तता करणे कठीण जात आहे.

या परिस्थितीत सदर नियम ग्रामीण वृत्तपत्रांसाठी अन्यायकारक ठरत असल्याचे संघटनेचे मत आहे. देशभरातील अनेक प्रकाशकांनी याबाबत तक्रारी केल्याचे संघटनेने नमूद केले. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक प्रत अपलोड करण्यासाठी किमान 60 तासांचा अवधी द्यावा तसेच छापील अंक पाठविण्याची अंतिम तारीख महिन्याच्या 15 तारखेपर्यंत वाढवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, आरएनआयच्या अन्य अडचणी निर्माण करणाऱ्या प्रणालींबाबत चर्चा करण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे शिष्टमंडळ लवकरच केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव तसेच महाराष्ट्राचे माहिती मंत्री ॲड. आशिष शेलार यांची भेट घेणार असल्याचे संघटनेच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.




# तालुका क्रीडा महोत्सवात कोटमी शाळेचे घवघवीत यश

## चिखलदरा तालुक्यात माध्यमिक चॅम्पियनचा बहुमान

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, ( दि.4 )**– सलोना येथे गुरुवार, 1 व 2 जानेवारी दरम्यान आयोजित तालुका क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात कोटमी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. विविध 23 क्रीडा प्रकारांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी विजय व उपविजेतेपद मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले.

या महोत्सवात प्राथमिक मुलींच्या कबड्डी व खो-खो संघांची जिल्हास्तरावर निवड झाली असून, माध्यमिक मुलांच्या रिले रेस संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या दमदार कामगिरीमुळे चिखलदरा तालुक्यातील माध्यमिक चॅम्पियन म्हणून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोटमी यांना सन्मानित करण्यात आले. या यशामागे शाळेतील शिक्षक, कर्मचारी, मुख्याध्यापक तसेच गावकऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडेची आवड निर्माण व्हावी व भविष्यात त्यांनी क्रीडा क्षेत्रात उंच भरारी घ्यावी, यासाठी शिक्षक जयेश वसुले सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक शरद पवार सर यांनीही विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले. सांस्कृतिक विभागात सुनंदा मोरे व ऋतुजा पाटील यांनी विद्यार्थ्यांची उत्कृष्ट तयारी करून प्रभावी सादरीकरण केले. हॉलीबॉल व वैयक्तिक स्पर्धांसाठी पाटणकर सर व दुर्वे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. या यशाबद्दल समस्त गावकरी, सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# लाखेवाडा गावात सार्वजनिक पाणीपुरवठा योजना बंद

## लाखेवाडा गावात सार्वजनिक पाणीपुरवठा योजना बंद | नागरिकांची पाण्यासाठी फरफट

महासागर | प्रतिनिधी

**चुरणी,( दि.4 )** – लाखेवाडा गावात सार्वजनिक पाणीपुरवठा योजना गेल्या अनेक दिवसांपासून पूर्णत: बंद असल्याने ग्रामस्थांचे मोठे हाल होत आहेत. गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून सध्या संपूर्ण गावाला हातपंपांवरच अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी सकाळी व सायंकाळी हातपंपांवर महिला, वृद्ध आणि नागरिकांची मोठी गर्दी दिसून येत असून पाण्यासाठी रांगा लागण्याचे चित्र आहे.

गावासाठी लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली पाण्याची टाकी सध्या पाण्याविनाच उभी आहे. त्यामुळे तिचा कोणताही उपयोग होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले होते; मात्र ते काम अर्धवट अवस्थेतच थांबले आहे. पाईपलाईनचे काम पूर्ण न झाल्याने गावात पाणीपुरवठा सुरू होऊ शकलेला नाही. या निष्काळजीपणाचा फटका थेट सामान्य नागरिकांना बसत आहे.





### डोक्यावर हंडे घेऊन आणावे लागते दूरवरून पाणी

लाखेवाडा गावाची लोकसंख्या सुमारे 3780 इतकी असून एवढ्या लोकसंख्येसाठी पुरेसा व नियमित पाणीपुरवठा होणे अत्यावश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र महिलांना डोक्यावर हंडे घेऊन दूरवरून पाणी आणावे लागत आहे. उन्हाळ्याचे दिवस जवळ येत असताना परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. लहान मुले, वृद्ध व आजारी नागरिकांना पाण्याअभावी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### निधी अभावी रखडले काम!

हातपंपांवरील वाढती गर्दी आणि पाण्यावर संपूर्ण गावाचे अवलंबित्व यामुळे सामाजिक तणाव वाढत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी एवढा संघर्ष करावा लागणे ही बाब लोकप्रतिनिधी व प्रशासनासाठी लाजिरवाणी असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, गावाचे सरपंच रामभाऊ बेठेकर यांनी सांगितले की, पाईपलाईन कामासाठी अंदाजपत्रक तयार आहे; मात्र 15व्या वित्त आयोगातून निधी ग्रामपंचायतीला उपलब्ध न झाल्यामुळे काम रखडले आहे. निधी उपलब्ध होताच पाईपलाईनचे अपूर्ण काम पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. ग्रामस्थांनी तातडीने पाणीपुरवठा योजना सुरू करण्याची ठाम मागणी केली आहे.

### योजना फक्त कागदोपत्री

ग्रामस्थांच्या मते पाणीपुरवठा योजना कागदोपत्री पूर्ण दाखवली जात असली, तरी प्रत्यक्षात ती अकार्यक्षम आहे. पाईपलाईनचे काम वेळेत पूर्ण न होणे, टाकी असूनही पाणी न भरणे आणि योजनेवर देखरेखीचा अभाव यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. अनेक वेळा ग्रामपंचायत व संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही केवळ आश्वासने मिळाल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

# सावित्रीबाईंनी हजारो मुलींच्या आयुष्याला नवी दिशा दिली -अभ्यंकर

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.4 )** – भारतीय समाजाच्या इतिहासात सावित्रीबाई फुले यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. शिक्षणाची मशाल हातात घेऊन त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि अन्यायाविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. त्या केवळ देशातील पहिल्या महिला शिक्षिका नव्हत्या, तर समाजक्रांतीच्या अग्रदूत होत्या. ज्या काळात मुलींना शिक्षण देणे पाप मानले जात होते, त्या काळात सावित्रीबाईंनी शाळा सुरू करून हजारो मुलींच्या आयुष्याला नवी दिशा दिली, असे प्रतिपादन समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर यांनी केले.

राहुल व्यायाम प्रसारक मंडळ येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेच्या संचालिका शुभांगी अभ्यंकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्यासारखी वेशभूषा साकारत प्रतिमेचे पूजन करून हारार्पण केले. कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर, अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, सहसचिव सतीश पुंडकर तसेच सदस्य मंगला वंजारी, जीवन फसाटे, गोरखनाथ पर्वतकर, समर्थ अभ्यंकर आणि विहान अभ्यंकर उपस्थित होते.



### प्रतिमेचे पुजन

येथील चित्रा चौकात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त राहुल व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क्षितिज म. अभ्यंकर तसेच संचालिका शुभांगी अभ्यंकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना हार अर्पण करून अभिवादन केले.



RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# झारखंडमधली आगळीवेगळी प्रथा

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे सर्व जाती धर्माचे लोक दिसतील. प्रत्येकाच्या प्रथा परंपरा वेगळ्या असतात. अशीच एक परंपरा भारतातील एका राज्यात आहे. जिथे स्त्रीला तिच्या आवडीचा पुरुष जीवनसाथी म्हणून निवडण्याचा अधिकार असतो. विशेष म्हणजे स्त्रीची निवड नाकारण्याचा अधिकार पुरुषाकडे नसतो.



झारखंडच्या काही आदिवासी भागात एक रीत आहे. एखादी स्त्री ज्या पुरुषाला पसंत करते, त्याच्या घरी जाऊन ती थेट सांगते, की हा माणूस माझा जोडीदार आहे. मग, तो पुरुष तिला ओळखत असो वा नसो, लग्न करणे त्याला बंधनकारक असते. नकार देण्याची मुभा त्याला नसते, कारण पूर्ण गाव आणि समाज तिच्या पाठीशी उभा राहतो.

**नकार दिल्यास संपत्तीत समान वाटा**

पुरुष तरीही नकार देत असेल, तर पंचायत निर्णय देते आणि तो नेहमी स्त्रीच्या बाजूने असतो. अशा वेळी त्या स्त्रीला पुरुषाच्या मालमत्तेचा निम्मा (५० टक्के) हिस्सा मिळतो. ही रीत अनेक पिढ्यांपासून चालत आली आहे. त्यामुळे महिलांना आर्थिक सुरक्षा मिळते.

**घरात राहण्याचा पूर्ण अधिकार**

नकाराच्या बाबतीतही स्त्रीला त्या घरातून हाकलता येत नाही. तिला स्वतंत्र खोली दिली जाते, जिथे ती सन्मानाने आणि आरामात राहू शकते. पुरुष वेगळ्या खोलीत राहतो; पण घर सोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. यामुळे महिलांचा आदर आणि स्वातंत्र्य जपले जाते.

**महिलांना देवीसमान दर्जा**

या समाजात महिलांना देवी मानले जाते. त्यांच्या इच्छा आणि निर्णयांना दैवी महत्त्व दिले जाते. त्यामुळे त्यांच्या मनातील आवडीला खूप मूल्य असते आणि त्यांचा शब्द अंतिम मानला जातो.

# कॅलिडोस्कोप

# सोन्याहूनही महाग?



सोन्याचा भाव प्रतितोळा सुमारे दीड लाख रुपयांपर्यंत पोहोचला. तेव्हा ते खरेदी करणे मध्यमवर्गीयांसाठी स्वप्न बनले. बहुतेक लोक असे गृहीत धरतात, की सोने हा जगातील सर्वात महागडा धातू आहे, परंतु ते अर्धसत्य आहे. सोने नक्कीच महाग आहे; परंतु सर्वात महाग नाही. जगात एक धातू आहे ज्याच्या किंमतीमुळे सोनेदेखील स्वस्त वाटते.

कॅलिफोर्नियम हा जगातील सर्वात महागडा धातू मानला जातो. फक्त एक ग्रॅम कॅलिफोर्नियमची किंमत २०० किलो सोन्याइतकी आहे. कॅलिफोर्नियम हा आतापर्यंतचा सर्वात महागडा धातू मानला जातो. हे लक्षात घेतले पाहिजे, की सोने आणि चांदीसारख्या धातूंचे उत्खनन केले जाते, परंतु कॅलिफोर्नियमच्या बाबतीत असे नाही. ते पृथ्वीवर नैसर्गिकरित्या आढळत नाही. कॅलिफोर्नियम हा एक कृत्रिम आणि किरणोत्सर्गी रासायनिक घटक आहे, जो वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये विशेष तंत्रांचा वापर करून तयार केला जातो. त्याचे रासायनिक चिन्ह सीएफ आहे. हा घटक केवळ मानवी वैज्ञानिक प्रगतीमुळे अस्तित्वात आहे.

**ते कधी शोधले गेले?**

अमेरिकेत कॅलिफोर्निया येथे १९५० मध्ये कॅलिफोर्नियमचा शोध लागला. शास्त्रज्ञांनी पहिल्यांदा एका प्रयोगादरम्यान ते तयार केले. ते निसर्गात आढळत नसल्यामुळे, आज अस्तित्वात असलेले सर्व कॅलिफोर्नियम पूर्णपणे मानवनिर्मित आहे. प्रत्येक उपयुक्त प्रमाण नियंत्रित आणि सुरक्षित परिस्थितीत तयार केले जाते. या धातूच्या अति किमतीचे सर्वात मोठे कारण म्हणजे ते तयार करण्याची जटिल प्रक्रिया. कॅलिफोर्नियम अणुभट्ट्यांमध्ये तयार केले जाते. त्यामुळे इतर जड घटकांना दीर्घकाळ न्यूट्रॉन किरणोत्सर्गाचा सामना करावा लागतो. ही प्रक्रिया केवळ अत्यंत मंदच नाही, तर त्यासाठी प्रचंड खर्च आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची देखील आवश्यकता असते. एक छोटीशी चूकदेखील संपूर्ण प्रयोग खराब करू शकते.

**किंमत किती?**

जगातील काही मोजक्याच देश आणि संशोधन सुविधांमध्ये कॅलिफोर्नियम तयार करण्याची क्षमता आहे. तिथेही त्याचे उत्पादन अत्यंत मर्यादित आहे. ते ग्रॅममध्ये नव्हे तर मायक्रोग्रॅममध्ये मोजले जाते. इतक्या कमी पुरवठ्यामुळे. त्याची किंमत गगनाला भिडणारी आहे. त्यामुळे ते सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर आहे.

सध्याच्या आंतरराष्ट्रीय किमतींनुसार, एक ग्रॅम कॅलिफोर्नियमची किंमत २७ दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. भारतीय चलनात, ही रक्कम २४४ कोटी ९६ लाख २७ हजार ६५० रुपये आहे. म्हणूनच ते आतापर्यंत तयार केलेल्या सर्वात महागड्या पदार्थांपैकी एक मानले जाते. त्याचे खरे मूल्य त्याच्या वैज्ञानिक गुणधर्मांमध्ये आहे. कॅलिफोर्नियमचा सर्वात महत्वाचा वापर अणु क्षेत्रात आहे. ते न्यूट्रॉन स्रोत म्हणून वापरले जाते. ते अणुभट्ट्या सुरू करण्यास आणि विशिष्ट वैज्ञानिक संशोधन पुढे नेण्यास मदत करते.

**कर्करोगावर प्रभावी**

वैद्यकीय क्षेत्रातही कॅलिफोर्नियमची भूमिका महत्त्वाची आहे. न्यूट्रॉन–आधारित कर्करोग थेरपीमध्ये कॅलिफोर्नियमचा एक विशिष्ट समस्थानिक, कॅलिफोर्नियम–२५१ वापरला जातो. ही पद्धत न्यूट्रॉन रेडिएशन वापरून कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करते. ही उपचारपद्धती सामान्य नाही; परंतु काही विशिष्ट आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये ती प्रभावी मानली जाते.

# पुन्हा सोन्याचा धूर?

भारतात सोन्याचा धूर निघायचा. आजही लोकांना सोन्याचे प्रचंड आकर्षण आहे. अनेक देशांप्रमाणे, भारताची रिझर्व्ह बँक, मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करते. तथापि, भारतात सोन्याच्या खाणी खूप कमी आहेत. ९९ टक्के सोने परदेशातून आयात केले जाते. आता सोन्याचा एक मोठा साठा सापडला आहे. तो काढल्यास भारत सोन्याच्या खाणीतील एक पॉवरहाऊस बनू शकतो. कर्नाटकातील कोप्पल जिल्ह्यातील अमरपूर ब्लॉकमध्ये हा सोन्याचा साठा सापडला. या शोधाने देशभरातील भूगर्भशास्त्रज्ञ, उद्योगपती आणि धोरणकर्ते आश्चर्यचकित झाले आहेत. जर भारताला हे सोने काढण्यात यश आले, तर ते सोन्याच्या खाणीत एक पॉवरहाऊस बनू शकते. अमरपूर ब्लॉकमध्ये सोन्याचे साठे लक्षणीय असू शकतात. येथे सोन्याचे ग्रेडिंग असामान्यपणे जास्त आहे. प्रति टन १२–१४ ग्रॅम इतके ग्रेडिंग आहे. ते सामान्यतः व्यावसायिकरित्या उपलब्ध असलेल्या खाणकाम स्थळांपेक्षा ४ ते ७ पट जास्त आहे.



**दररोज २५ ते ३० किलो सोने काढणे शक्य**

राज्याच्या खाण आणि भूगर्भशास्त्र विभागाने सहा लाख हेक्टर क्षेत्रावरील पुनर्प्राप्ती सर्वेक्षणादरम्यान सोन्याच्या शोधाची पुष्टी केली. सुरुवातीच्या पृष्ठभागाच्या नमुन्यांमध्ये आढळलेल्या सोन्याच्या पातळीवरून असे दिसून आले, की सोन्याची पातळी ८ ते १० ग्रॅम प्रति टन राहिली, तर एका खाणीतून दररोज २५ ते ३० किलो सोने मिळू शकते. त्याची किंमत आजच्या किमतीनुसार १८ ते २२ कोटी आहे.

**साठे सापडले, काढण्याचे आव्हान कायम**

सोन्याचे साठे सापडले आहेत; परंतु ते काढणे एक आव्हान आहे. हे संरक्षित वन क्षेत्र आहे. अमरापूर ब्लॉक संरक्षित वन क्षेत्र आणि पर्यावरण–संवेदनशील क्षेत्रात येतो. नियमांनुसार, स्टेज १ वन मंजुरीशिवाय १० ते २० मीटरपेक्षा कमी खोदकाम करण्यास मनाई आहे. सोन्याच्या खाणींबद्दल वन विभागाला अनेक चिंता आहेत. त्यात वन्यजीव मार्गांवर, भूजल पुनर्भरण क्षेत्रांवर, जवळच्या आदिवासी वस्त्यांवर आणि पश्चिम घाटाच्या संवेदनशील पर्यावरणावर होणारा संभाव्य परिणाम यांचा समावेश आहे.

**तस्करी वाढण्याची शक्यता**

एका वनक्षेत्रात सोन्याची खाण सापडल्याच्या बातमीने सर्वांनाच गोंधळात टाकले आहे. राजकीय आणि औद्योगिक गट मंजुरी जलद करण्यासाठी दबाव आणत आहेत. सरकारी मान्यता नसल्यामुळे आणि वनक्षेत्रात वाढत्या देखरेखीमुळे, बेकायदेशीर सर्वेक्षण आणि उत्खननाचे प्रयत्न वाढले आहेत. येथे सोन्याचे खाणकाम आणि तस्करी होण्याची शक्यता आहे. कर्नाटक सरकारने आता वन विनियोग प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी एक आंतर–विभागीय समिती स्थापन केली आहे. २०२६ च्या मध्यापूर्वी पहिल्या टप्प्याची मंजुरी मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यानंतरच जी३–स्तरीय खोल खोदकाम सुरू होऊ शकेल. शक्य असले तरी, व्यावसायिक खाणकाम सुरू होण्यास किमान ५ ते ८ वर्षे लागतील.

# या आहेत धोकादायक नोकऱ्या

जगभरातले बरेच लोक धाडसी कामं करतात. धाडसी खेळ खेळतात. जीवावर उदार होऊन लोकांचे जीव वाचवतात. काही लोक अधूनमधून धाडस करतात. तर काहींसाठी हे धाडसच त्यांचं आयुष्य बनून जातं. धाडस हाच अनेकांचा पेशा असतो. नोकरी असते. जगभरातल्या अत्यंत धोकादायक अशा नोकऱ्यांविषयी आपण जाणून घेऊ या.



* बॉम्ब निकामी करण्याचं काम अत्यंत घातक असतं. बॉम्ब निकामी करताना त्याचा स्फोट होऊन शरीराच्या चिंधड्या होऊ शकतात. पण सर्वसामान्यांना वाचवण्यासाठी जीवावर उदार होऊन बॉम्ब निकामी करण्याचं काम या चमूतले लोक करत असतात.
* अग्निशमन दलातल्या अधिकाऱ्यांनाही जीवावर उदार व्हावं लागतं. आग लागलेल्या ठिकाणी त्यांना लोकांना वाचवायचं असतं. आग नियंत्रणात आणायची असते. हे सगळं जीवावरही बेतू शकतं. पण अग्निशमन अधिकारी मोठ्या धाडसाने हे काम करतात.
* पोलीस विभागात एन्काउंटर तज्ज्ञ असतात. हे तज्ज्ञ कुख्यात गुंडांना कोंडीत पकडतात. त्यांच्यावर हल्ला करून मारून टाकतात. या चकमकीत पोलिसांच्या जीवालाही धोका असतो.
* गॅस, तेल तसंच विद्युत कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारी खूप धोका पत्करतात. त्यांच्याकडून झालेली छोटीशी चूकही होत्याचं नव्हतं करू शकते. त्यांच्यावर खूप मोठी जबाबदारी असते.
* चित्रपटांमध्ये स्टंटबाजी केली जाते. उंचावरून उडी मारणं, खलनायकासोबत मारामारी करणं अशी बरीच दृष्यं साकारायची असतात. ही कामं नायक नाही तर स्टंटमॅन करतात. हे काम करताना जीव धोक्यात घालावा लागतो.




# अंटार्क्टिकाचं गूढ

अंटार्क्टिका हा बर्फाळ प्रदेश आहे. नजर जाईल तिथे फक्त बर्फ आढळतो. अर्थात वाढत्या तापमानामुळे अंटार्टिकावरचा बर्फ वितळू लागला आहे. यामुळे पाण्याच्या पातळीत वाढ होत आहे. संपूर्ण जगासाठी ही धोक्याची घंटा आहे. अत्यंत प्रतिकूल वातावरणामुळे इथे मानवी वस्ती नावालाही नाही. पण शास्त्रज्ञांना या ठिकाणी मानवी अवशेष मिळाले आहेत. या ठिकाणी बरेच शास्त्रज्ञ आणि संशोधक पोहोचले. पण अनेकांचे मृतदेहही सापडले नाहीत. त्यांच्या मृत्यूचं गूढ अजूनही उकललेलं नाही. अंटार्टिकावर लिविंगस्टन नावाचं एक बेट आहे. इथे १९८० मध्ये चीलीतल्या संशोधकांना एका महिलेच्या शरीराचे अवशेष मिळाले. हे अवशेष १७५ वर्षांपूर्वीचे असल्याचा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. या महिलेचा मृत्यू तिच्या वयाच्या २१ व्या वर्षी झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. १८१९ ते १८२५ दरम्यान तिचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जाते आहे. हे अंटार्टिकावरचे सर्वात प्राचीन असे मानवी अवशेष आहेत. दक्षिण चीलीपासून एक हजार किलोमीटर अंतरावर या महिलेचे अवशेष सापडले आहेत. त्यामुळे ती चीलीची रहिवासी असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. ही महिला या ठिकाणी कशी पोहोचली असेल याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत. ही महिला स्थानिक गाईड म्हणून काम करत असल्याची शक्यताही व्यक्त होत आहे. तब्बल १७५ वर्षांपूर्वीचा मानवी सांगाडा मिळाल्याने त्या काळात अंटार्टिकावर मानवाने पाऊल टाकायला सुरूवात केली होती, ही बाब समोर आली आहे. यामुळे शास्त्रज्ञांच्या मनात नवी आशा निर्माण झाली आहे. अंटार्टिकाच्या बर्फात दडलेल्या अनेक गूढ गोष्टी यामुळे उघड होण्याची शक्यता आहे.

# २१ वेळा बदलले नाव!

भारतातील प्रत्येक शहराची एक वेगळीच कहाणी आहे. मग ती त्याच्या स्थापनेबद्दल, त्याच्या राज्यकर्त्यांबद्दल आणि त्याच्या सांस्कृतिक उत्क्रांतीबद्दल असो, प्रत्येक कहाणी एक खोलवरची कहाणी सांगते. अशाच एका शहराने त्याचे नाव एकदा नाही, दोनदा नाही तर इतिहासात २१ वेळा बदलले आहे. हे शहर उत्तर प्रदेशात आहे.



या शहराचे नाव कानपूर आहे. त्याचे मूळ नाव कान्हापूर होते. त्याची स्थापना हिंदू सिंह चंदेल यांनी केली होती. शतकानुशतके, कानपूरवर मुगलांपासून ब्रिटिशांपर्यंत विविध शासकांनी राज्य केले. सत्ता, प्रशासन आणि भाषेतील बदल प्रतिबिंबित करण्यासाठी शहराचे नाव वारंवार बदलले. त्याच्या वारंवार बदलांमागील एक कारण म्हणजे अधिकृत नोंदींसाठी उच्चार आणि स्पेलिंग सोपे करण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न.

**वारंवार नाव का बदलते?**

राजकीय सत्तेतील बदल, वसाहतवादी प्रभाव आणि स्पेलिंग सुधारणांमुळे कानपूरचे नाव अनेक वेळा बदलले गेले. ब्रिटिश राजवटीत, हे ठिकाण प्रशासन आणि उद्योगाचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. परिणामी, त्याचे नाव कानपूर असे ठेवण्यात आले. त्याचे अंतिम नाव १९४८ मध्ये बदलले गेले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, त्याचे अधिकृतपणे कानपूर असे नामकरण करण्यात आले.

**कानपूरची इतर नावे**

कानपूरला अनेक नावांनी ओळखले जात असे. कान्हापूर, कन्हैयापूर, करणपूर, कोन्पूर, कोन्पौर, खानपूर, पत्कापूर, सीतामऊ आणि कान्पौर. ही इतर नावे शहराच्या जटिल आणि मनोरंजक भूतकाळाचे प्रतिबिंबित करतात.

**औद्योगिक आणि सांस्कृतिक महत्त्व**

आज कानपूरला भारताची 'लेदर सिटी' म्हणून देखील ओळखले जाते. कारण ते देशांतर्गत आणि परदेशात चामड्याची उत्पादने निर्यात करते. इतकेच नाही तर हे शहर साखर उद्योगाचे एक प्रमुख केंद्र आहे. राष्ट्रीय साखर संस्था येथे आहे. आज, कानपूर कानपूर नगर आणि कानपूर देहात जिल्ह्यांमध्ये विभागले गेले आहे. शहर अजूनही त्याच्या समृद्ध ऐतिहासिक वारसा आणि औद्योगिक विकासामध्ये एक उत्तम संतुलन राखते. १८५७ च्या क्रांतीतील भूमिकेमुळे कानपूरला भारतीय इतिहासात एक विशेष स्थान आहे. नानासाहेब, तात्या टोपे आणि अझीमुल्ला खान यांसारख्या नेत्यांनी ब्रिटिश सैन्याविरुद्ध बंडाचे नेतृत्व केले. कानपूर हे एक असे शहर आहे, जे त्याच्या अनेक नावापासून ते भारताच्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंत, प्रत्येक कोपऱ्यात इतिहासाच्या कथा साठवते.



# अशीही परंपरा

श्रद्धा म्हणून अनेकजण मंगलप्रसंगी पायांमध्ये चपला घालत नाहीत. नवरात्रींमध्ये बरेच भक्त अनवाणी चालतात. पण भारतात असं एक गाव आहे जिथे चप्पल घालणं खपवून घेतलं जात नाही. गावाच्या हद्दीत येणाऱ्यांनी चप्पल घातली तर शिक्षा दिली जाते. तमिळनाडूतल्या मदुराईपासून २० किलोमीटर अंतरावर कलिमायन नावाचं गाव आहे. या गावातले लोक अनवाणी फिरतात. गेल्या अनेक वर्षांपासून इथे हीच परंपरा आहे आणि तिचं काटेकोर पालन केलं जातं. चप्पल घालून येणाऱ्याला इथे प्रवेश दिला जात नाही. लहान मुलांनाही इथे चप्पल घालता येत नाही. या परंपरेमागे एक महत्त्वाचं कारण आहे. इथले लोक अपाच्छी नामक देवतेचे भक्त आहेत. वर्षानुवर्षं हे लोक या देवतेची पूजा करतात. ही देवता आपलं आणि आपल्या गावाचं रक्षण करत असल्याची त्यांची श्रद्धा आहे. या देवतेचा मान म्हणून गावातले लोक अनवाणी फिरतात. गावात चप्पल घालून फिरता येत नाही. अर्थात गावाबाहेर गेल्यावर हे लोक चप्पल घालू शकतात. बाहेर जायचं असेल तर लोक हातात चप्पल घेऊन जातात. वेशीबाहेर पडल्यावर ते चप्पल घालतात. ही या गावातली अनोखी परंपरा म्हटली पाहिजे.

# शिकारीच होणार होते हत्तींची शिकार

प्राण्यांची शिकार करायला गेलेल्या शिकाऱ्यांवर प्राण्यांनीच हल्ला चढवला तर? असंच काहीसं नामिबियामध्ये घडलं आहे. उत्तर–पूर्व नामिबियातल्या नाकाबोलेलवा भागातल्या हत्तींच्या कळपाने दोन शिकाऱ्यांवरच हल्ला चढवला. इतकंच नाही, तर त्यांना परतून लावलं. याबाबतचा एक व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे. आपल्या एका सहकाऱ्याला जखमी झालेलं पाहून सर्व हत्ती बिथरले आणि त्यांनी शिकाऱ्यांचा पाठलाग सुरू केला. हत्ती मागे लागल्याचं पाहून शिकाऱ्यांनाही दरदरून घाम फुटला आणि त्यांनी तिथून पळ काढला. नामिबियातला हा व्हिडिओ जवळपास चार वर्षांपूर्वीचा असल्याचं बोललं जात आहे. शिकाऱ्यांच्या जोडीपैकी एकाने कळपातल्या हत्तीवर गोळी झाडली. गोळी लागल्यामुळे हत्ती जखमी झाला. हे बघून उर्वरित हत्ती खूप रागावले. त्यांनी शिकाऱ्यांवर हल्ला चढवला. या प्रदेशातल्या हत्तींची संख्या आता खूप कमी झाली आहे. याआधी इथे हत्तींची शिकार करायला परवानगी होती. पण हत्तींच्या संख्येत झपाट्याने घट झाल्याने एका वर्षात फक्त दोन हत्तींना मारण्याची परवानगी मिळू लागली. चार वर्षांपूर्वी इथे येणारे पर्यटक हत्तींची शिकार करत असत. पण आता त्यावर बंदी आली आहे. तसंचशिकार करताना शिकारीच कसे अडकू शकतात हे दिसू लागलं आहे.



# पृथ्वीच्या पोटात अथांग महासागर!

पृथ्वीच्या निर्मितीबाबतचे चार अब्ज वर्ष जुने सर्वात मोठे रहस्य उलगडले आहे. पृथ्वीच्या आत अथांग गुप्त महासागर अचानक गायब कसा झाला याबाबतदेखील संशोधनात महत्वपूर्ण माहिती समोर आली आहे. या महासागराचे अस्तित्व आणि पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण होण्याची प्रक्रिया समजून घेण्यास संशोधकांना मदत होणार आहे.

चीनी शास्त्रज्ञांनी ही महत्त्वाची यंत्रणा शोधून काढली आहे. पृथ्वीची निर्मिती सुरू असतानाच इतके पाणी कसे साठवले असेल हे स्पष्ट करते. एकेकाळी अग्नीचा गोळा असलेला पृथ्वी ग्रह जीवसृष्टी असलेला ग्रह आहे. पृथ्वीवर जीवसृष्टी कशी निर्माण झाली हे समजून घेण्यास या शोधामुळे आपल्याला मदत होते. 'चीनी अकादमी ऑफ सायन्सेस'मधील संशोधकांनी केलेल्या प्रयोगांवरून असे दिसून आले आहे, की पृथ्वीचे खोल आवरण चार अब्ज वर्षांपूर्वी पाण्याचा एक विशाल साठा असू शकतो. हा अभ्यास 'सायन्स जर्नल'मध्ये प्रकाशित झाला आहे.



पृथ्वीच्या खोल आवरणात वितळलेला मॅग्मा थंड होऊन घनरूप झाल्यामुळे पाणी गायब झाल्याचा दावा जर्नल लेखात करण्यात आला आहे. या शोधाचे केंद्रबिंदू ब्रिजमनाइट नावाचे खनिज आहे, जे पृथ्वीच्या खालच्या आवरणात मुबलक प्रमाणात आढळते. पूर्वी असे मानले जात होते, की हे खनिज जास्त प्रमाणात जमा होऊ शकत नाही. शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत पृथ्वीच्या खालच्या आवरणासारखीच अत्यंत परिस्थिती पुन्हा निर्माण केली. त्यांनी डायमंड ॲन्व्हिल सेल आणि लेसर हीटिंगचा वापर करून अत्यंत उच्च दाब आणि सुमारे ४,१०० अंश सेल्सिअस तापमान निर्माण केले. यावरून असे दिसून आले, की तापमान जितके जास्त असेल तितकेच वितळलेल्या मॅग्मापासून तयार होणारे ब्रिजमनाइट खनिज पाणी अडकवण्यात आणि साठवण्यात चांगले होते. या प्रक्रियेमुळे पृथ्वीच्या घन आवरणात मोठ्या प्रमाणात पाणी गोठलेले असावे. हे पाणी आजच्या महासागरांच्या आकारमानाच्या ०.०८ ते १ पट असू शकते. लाखो वर्षांपासून, ज्वालामुखीच्या उद्रेकाद्वारे पाणी हळूहळू पृथ्वीच्या पृष्ठभागावर परत सोडले जात आहे. या पाण्यामुळे पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण झाली.

# अमरावतीत आयटी पार्क उभारणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'रोड शो' चे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती/अकोला/चंद्रपुर, दि. ४ :



महापालिका निवडणुकीची रणधुमाळी रंगात आली असताना रविवारी अमरावतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोचे आयोजन करण्यात आले. पंचवटी चौकापासून सुरू झालेल्या या यात्रेचा समारोप साईनगर येथील साईमंदिराजवळ झाला. मुख्यमंत्र्यांनी यावेळी अमरावती हे अत्यंत महत्वाचे शहर म्हणून विकसित करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत, पुढल्या काळात अमरावतीतील तरूणांसाठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी) गुंतवणूक आणली जाईल, अशी घोषणा पत्रकारांशी बोलताना केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अमरावती आणि संपूर्ण पश्चिम विदर्भामध्ये डॉ. पंजाबराव देशमुखांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षणाचा प्रसार केला. आता अमरावतीत आयटी क्षेत्रातील उद्योग आले पाहिजेत, यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. अमरावतीत लवकरच आयटी पार्क उभारले जाईल.

मुख्यमंत्री म्हणाले, अमरावतीकरांनी रोड शोला प्रचंड प्रतिसाद दिला, याचा मला आनंद आहे. अमरावती महापालिकेत यापुर्वी भाजपची सत्ता होती आणि आताही भाजपला पूर्ण बहुमत मिळणार आहे. अमरावतीच्या विकासासाठी आमच्या सरकारने अनेक योजना आणल्या. अमृत योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठ्याची कामे केली जात आहेत. २१२ कोटी रुपयांचा रस्ते विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. अमरावतीत दक्षिण आशियातील सर्वात मोठी विमानोड्डाण प्रशिक्षण संस्था उभारली जात आहे. या प्रकल्पाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, टेक्स्टाईल पार्कमुळे येथील तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. आता पीएम-मित्र मेगा टेक्स्टाईल पार्कमुळे लाखो लोकांना रोजगार प्राप्त होणार आहे. अमरावतीत भुयारी गटार योजना पूर्ण करण्यासाठी २५६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. २०० कोटी रुपये अंबादेवी प्रकल्पासाठी मिळणार आहेत. छत्री तलाव, वडाळी तलाव सौंदर्यीकरणाची कामे आगामी काळात केली जाणार आहेत.

येथील पंचवटी चौकातून देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोला सुरूवात झाली. खुल्या जीपमधून ते विलासनगर, राजकमल चौक, गांधी चौकमार्गे साईनगर येथे पोहोचणार होते. अंबादेवी मंदिरापर्यंत त्यांनी खुल्या जीपमधून प्रवास केला. ठिकठिकाणी नागरिकांनी त्यांच्यावर पुष्पवर्षाव केला. पण, त्यांना अकोला येथे जायचे असल्याने आणि सायंकाळी विमानोड्डाण शक्य नसल्याने त्यांना घाईघाईतच साईनगर येथे पोहोचावे लागले. खुल्या जीपमध्ये त्यांच्यासमवेत माजी खासदार नवनीत राणा, भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे आणि इतर नेते होते. साईनगर येथे पोहचल्यानंतर त्यांनी साईमंदिरात दर्शन घेतले. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय कुटे उपस्थित होते.

अकोल्यात महापालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचाराचे रणशिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी जाहीर सभेतून फुंकले. यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, प्रकाश भारसाकळे, हरीश पिंपळे, अमोल मिटकरी, माजी राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, डॉ. दशरथ भांडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. टीका करण्यासाठी आलो नसून कोणाला दूषणं देणार नसल्याचे स्पष्ट करीत त्यांनी योजना व विकास कामांचा आढावा मांडला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ह्यह्यमहाराष्ट्रातील ५० टक्के नागरिक शहरात राहतात. महापालिकेची निवडणूक ४० ते ४५ टक्के लोकांच्या जीवनावर परिणाम करणारी आहे. पूर्वी गावांचा विकास म्हणजे देशाचा विकास ही संकल्पना होती. सात दशके सत्ताधाऱ्यांनी शहरी विकासाकडे दुर्लक्ष केले. शहरांमध्ये प्रचंड समस्या निर्माण झाल्या. शहराची बकाल अवस्था तयार झाली. २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कारभार स्वीकारल्यावर गावासोबतच शहरी विकासाचा संकल्प घेतला. ६५ टक्के जीडीपी शहरात तयार होतो. रोजगार निर्मिती शहरातून होते. त्यामुळे शहरांचे नियोजन आवश्यक आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदा शहरांसाठी योजना सुरू केल्या. अनेक योजनांच्या माध्यमातून लाखो कोटी रुपये शहरांना दिले. त्यामुळे शहरे विकसित होत आहेत.

### नगर परिषदेत पराभवाने पुर्ण ताकदीने भाजपा मैदानात

चंद्रपूर जिल्ह्यात नगर परिषद निवडणुकीत लाजीरवाणा पराभवाचा सामना करावा लागल्याने महानगर पालिका निवडणूक संपूर्ण ताकदीनिशी उतरलेल्या भाजपाने आज आपल्या स्टार प्रचारक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोने प्रचाराचा जोरदार सुरुवात केली. रोड शो ला मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. जमलेली प्रचंड गर्दी पाहून आनंदित झालेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी चंद्रपुरात विकासासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीची घोषणा करीत चंद्रपूरला विकसित शहर बनविण्यासाठी जनतेला भाजपा शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकालीचे दर्शन घेऊन मुख्यमंत्री यांनी रोड शो ला सुरूवात केली. यावेळी माजी मंत्री सुधिर मुनगंटीवार, हंसराज अहिर, आ. किशोर जोरगेवार, पालकमंत्री अशोक उइके, आ. बंटी भांगडिया आदि उपस्थित होते.

## रानगव्याच्या हल्ल्यात शेतकरी ठार

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ४ :



गोरेगांव तालुक्यातील सोनेगाव येथे गावातून शेताकडे जात असताना जंगलातून आलेल्या रानगव्याने शेतकऱ्यावर हल्ला केला. त्यात शेतकऱ्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या गोरेगांव तालुक्यातील सोनेगाव येथे रविवार ४ जानेवारी सकाळी ९:४५ वाजता दरम्यान घडली.

मृतक शेतकऱ्याचे नाव नीलकंठ नंदलाल तुरकर ( ५७) रा. सोनेगाव तालुका गोरेगाव जिल्हा गोंदिया असे आहे. नीलकंठ हा नेहमीप्रमाणे सकाळी घरातून शेताकडे जाण्यासाठी निघाला. गावातील चौकात मित्रमंडळी सोबत थोड्यावेळ गप्पा गोष्टी केल्यानंतर सोनेगाव ते शहारवाणी रस्त्यावर असलेल्या शेताकडे जाण्यासाठी निघाले. अचानक जंगलातून आलेल्या रानगव्याने त्यांच्यावर हल्ला चढवून पोटात शिंगे खुपसली. यात ते गंभीर जखमी झाले. त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही बातमी गावात पसरताच गावकऱ्यांनी तिकडे धाव घेत रानगव्याला पिटाळून लावले. मात्र त्यानंतर सदर रानगवा कवलेवाडा, चिचगावटोला परिसरात आल्याने या भागातील लोकांनी ही त्याला पिटाळून लावले.

तिरोडा तालुक्यातील सुकडी/डाकराम, पिंडकेपार, खडकी, डोंगरगाव, खमारी, बालापूर, आलेझरी, बेरडीपार, खुशीपार या गावांच्या परिसरात बिबट्या आणि अस्वलाचा वावर आहे. पिंडेकपार गावात प्रवेश करून बिबट्याने राजू शेंडे यांच्या गायीची शिकार केली तर वासराला जखमी केले. राजू शेंडे हे गोठ्यात म्हशीला सोडण्यासाठी गेले. असता उघडकीस आली. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यांनी याची माहिती पिंडकेपार, बोदलकसा बिटचे वनरक्षक पटले यांना दिली. मागील तीन ते चार दिवसांपासून पिंडकेपार येथे बिबट्या फिरतोय. याची माहिती वनविभागाला देण्यात आली होती.

## लव्ह जिहाद घडत असेल, तर संसदेत त्याचा अधिकृत डेटा का देत नाही?

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ४ :



लव्ह जिहाद सारखे प्रकार रोखण्यासाठीचे उपाय घरापासूनच व्हायला हवेत. घरातील सदस्यांमध्ये सुसंवाद असायला हवा, तसेच महिलांनी सतर्क राहायला हवे, असे वक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले आहे.

कुटुंबात एकमेकांमधील संवाद कमी होत असल्यामुळेही असे प्रकार वाढले आहेत, असे मोहन भागवत यांनी शनिवारी भोपाळ येथे आयोजित कार्यक्रमात म्हटले. त्यावर एआयएमआयएम पक्षाचे नेते खासदार असदुद्दिन ओवेसी यांनी अमरावतीत पत्रकार परिषदेत बोलताना प्रतिक्रिया व्यक्त केली. एखादी व्यक्ती १८ किंवा २१ वर्षांची प्रौढ असेल आणि स्वतःचे निर्णय घेत असेल, तर तो कोणाच्याही आवडीनिवडीचा विषय नसून कायद्याने दिलेला अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले. जर खरेच लव्ह जिहाद सारखे प्रकार घडत असतील, तर त्याचा अधिकृत डेटा संसदेत सादर करा. गेल्या ११ वर्षांचा रेकॉर्ड द्या. लव्ह जिहाद नेमके काय, याची स्पष्ट व्याख्या भाजप आणि मोहन भागवत यांनी करावी, असे थेट आव्हान ओवेसी यांनी दिले.

**असदुद्दिन ओवेसी यांचा सवाल**

## व्यवस्थित बोला, अन्यथा... अमोल मिटकरींचे प्रत्युत्तर

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ४ :



महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीतील नेत्यांमध्येच जुंपली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार व भाजप प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्यात वाकयुद्ध रंगले असतांना त्यामध्ये आता राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी सुद्धा उडी घेतली. व्यवस्थित बोला, काळजी पूर्वक बोला, अन्यथा राष्ट्रवादीचा कार्यकर्ता कदापी सहन करणार नाही, अशा शब्दात आ. मिटकरी यांनी आ. रवींद्र चव्हाणांना प्रत्युत्तर दिले. या टीकेनंतर भाजप व राष्ट्रवादीतील वाद आणखी पेटण्याची चिन्हे आहेत.

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर बोलताना पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर भ्रष्टाचाराचा कळस गाठला गेला.

## ज्ञानगंगामध्ये वाघाची रुबाबदार एंट्री

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ४ :



नवीन वर्षातील ही सर्वात मोठी ब्रेकिंग, सुखद वार्ता, गुड न्यूज म्हणजे बुलढाणा ते खामगाव राज्य मार्गदरम्याच्या ज्ञानगंगा अभयारण्यात वाघाची शानदार अन यशस्वी एंट्री झाली आहे. अभयरण्यात दाखल होताच तीन तासातच त्याने शिकार करत स्वतःचे सामर्थ्य आणि साम्राज्याच्या अस्तित्वाची जाणीव इतरांना करुन दिली.

वाघाच्या आगमनामुळे जिल्ह्यातीलच नव्हे विदर्भातील वन अधिकारी, कर्मचारी, वन्यजीव प्रेमी आणि ३० लाख बुलढाणेकरांनी आनंद व्यक्त केला आहे. ज्ञानगंगा अभयारण्यातील शेकडोच्या संख्येतील बिबट, अस्वल, तडस अशा हिंस्त्र पशुंच्या सोबतीला आता वाघ आला आहे.

रविवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास नर जातीचा पीकेसीटी-१ नावाचा वाघ ज्ञानगंगा अभयारण्यात देव्हारी आणि बोरखेड-तारापूर जंगलाच्या बाजूने सोडण्यात आला आहे. याठिकाणी बंदीस्त जाळी आहे. विशेष म्हणजे या वाघाने आज सकाळी एक शिकारही केली आहे. त्यामुळे हा वाघ ज्ञानगंगा अभयारण्यात रूळणार, यात शंका नाही.

मिळालेल्या माहितीनुसार रात्री २ वाजेपासून पीकेसीटी वन या वाघाला बंदीस्त क्षेत्रात ठेवण्यात आले आहे. पेंच अभयारण्यातून या वाघाला आणले गेले आहे. याचे वय ३५ महिने असून तो अजून किशोरवस्थेत आहे. अर्थात याचे मूळ पांढरकवडा व्याघ्र प्रकल्प आहे. फेब्रुवारी मार्च २०२३ मध्ये त्याची आई मरण पावली होती. चार ते पाच महिन्याचे छावे (पिल्ल) त्यावेळी मिळाले होते. त्यात एक नर आणि मादी जातीचे बछडे होते. नंतर त्यांना पेंच व्याघ्र प्रकल्पात ठेवले होते. तिकडे दोघेही वाढले. आता ३ वर्षाचे झाल्यानंतर यातील वाघाला ज्ञानगंगामध्ये आणले गेले. वाघीण अजूनही पेंचमध्येच आहे.

ज्ञानगंगा अभयारण्यात नर वाघ पीकेसीटी-१ याची यशस्वी एंट्री झाली आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये पांढरकवडा व्याघ्र प्रकल्पात आई गमावलेल्या या वाघाचा वय ३५ महिने असून तो किशोरवयीन आहे. अभयारण्यात दाखल होताच तीन तासांतच वाघाने शिकार करून आपले सामर्थ्य दाखवले.

जवळपास १५ ते १६ तासांचा प्रवास करून वाघ मध्यरात्रीच्या सुमारास बुलढाणा जिल्ह्यात दाखल झाला. त्याला बेशुद्ध करण्यात आले होते. तीन ते चार तासानंतर तो शुद्धीत आला. नंतर त्याला अभयारण्यातील बंदीस्त क्षेत्रात सोडण्यात आले.

## वॉकिंगसाठी निघालेल्या वृद्धाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

घरून वॉकिंगसाठी निघणे एका वृद्धाच्या जीवावर बेतले. भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी होऊन त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. विठ्ठल नारायण पाटील (८०) रा. अमर-आशा लेआऊट, इंद्रप्रस्थनगर असे मृताचे नाव आहे.

शनिवारी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास विठ्ठल नेहमीप्रमाणे घरून वॉकिंगसाठी निघाले होते. जयताळा रोडने जात असताना भेले कबाडीवालाजवळ भरधाव आलेल्या दुचाकी क्र. एमएच-२८/८०२३ च्या चालकाने विठ्ठल यांना मागून जबर धडक दिली.

यात खाली सीमेंट रस्त्यावर पडून विठ्ठल गंभीर जखमी झाले. आसपासचे नागरिक त्यांच्या मदतीला धावले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. प्रतापनगर पोलिस घटनास्थळी पोहोचले. तात्काळ त्यांना खासगी रुग्णालयात नेले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने मेडिकलला रेफर करण्यात आले. विठ्ठल यांना मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.







